नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक

■ वृत्तसंस्था, उधमपूर, दि. ४ :

जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यातील बसंतगड परिसरात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. ही चकमक 'किया' ऑपरेशनदरम्यान झाली.

लष्कराच्या व्हाईट नाईट कोअर अंतर्गत सीआयएफ डेल्टा, जम्मू-काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर बसंतगड परिसरात शोधमोहीम सुरू केली होती. जंगल परिसरात शोधमोहिमेदरम्यान लपलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. जवानांनी तात्काळ प्रत्युत्तर दिले, त्यानंतर चकमक सुरू झाली.

* वर्ष ५१ * अंक २१३ * * अमरावती * गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

# १५ फेब्रुवारीपासून खरेदीवर बंदी

## अर्थखाते घेताच फडणवीसांचा धडाकेबाज आदेश : फर्निचरपासून सेमिनारपर्यंत खर्च बंद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

राज्यातील विविध सरकारी विभागांकडून होणाऱ्या अनावश्यक आणि मनमानी खरेदीवर नियंत्रण आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णायक पावले उचलली आहेत.

अर्थखात्याची सूत्रे स्वतःकडे घेतल्यानंतर त्यांनी नव्या निविदा काढण्यावर तसेच खरेदी प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यावर तातडीची बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. वित्त विभागाकडून सर्व प्रशासकीय यंत्रणांना कळवण्यात आले आहे की, १५ फेब्रुवारीपासून कोणत्याही प्रकारच्या खरेदी प्रस्तावांना मंजुरी देण्यात येणार नाही आणि नव्या निविदा प्रक्रियेलाही विराम दिला जाईल. या निर्णयामुळे वर्षअखेरच्या काळात होणाऱ्या खर्चाच्या पद्धतीवर मोठा परिणाम होणार आहे.




या आदेशाच्या कक्षेत फर्निचर दुरुस्ती, ड्रायव्हर मशीन, संगणक व इतर उपकरणे, सुटे भाग खरेदी, कार्यालये भाड्याने घेणे, सेमिनार, भौतिक कार्यशाळा अशा अनेक खर्चांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच नियमित प्रशासकीय गरजांच्या नावाखाली होणाऱ्या विविध खरेदींना तात्पुरता ब्रेक लावण्यात आला आहे. मात्र, औषध खरेदीला या निबंधांतून वगळण्यात आले असून आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाला आवश्यक औषधसाठा खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय केंद्र पुरस्कृत योजना, त्याअंतर्गत राज्य हिस्सा आणि बाह्य सहाय्यित प्रकल्पांतील खरेदी प्रस्तावांना या बंदीतून सूट देण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष संपण्याच्या टप्प्यावर अनेक विभागांकडून उपलब्ध निधी खर्च करण्यासाठी घाईघाईने खरेदी केली जाते, असा आरोप अर्थ विभागाकडून करण्यात आला आहे. केवळ मंजूर निधी परत जाऊ नये, या उद्देशाने वर्षअखेर अनावश्यक वस्तूंची खरेदी होते, असा निष्कर्ष वित्त विभागाच्या आढाव्यातून समोर आला आहे. यामुळे शासनाच्या तिजोरीवर अनावश्यक ताण निर्माण होतो.

ही प्रवृत्ती रोखण्यासाठीच हा कठोर निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थखात्याचा सखोल आढावा घेत खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

हा आदेश सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था तसेच नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनाही लागू असेल. त्यामुळे राज्यातील प्रशासनाच्या सर्व स्तरांवर या निर्णयाचा परिणाम दिसून येणार आहे. कार्यालयीन सोयीसुविधा, प्रशिक्षण कार्यक्रम, उपकरणे दुरुस्ती यांसारख्या नियमित खर्चांनाही या निर्बंधांचा फटका बसणार आहे. मात्र, अत्यावश्यक सेवांमध्ये खंड पडू नये याची काळजी घेत औषध खरेदीसारख्या बाबींना सूट देण्यात आली आहे.

लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर वाढलेल्या ताणाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतुदी लागणाऱ्या योजनांमुळे खर्चाचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक ठरले आहे.

त्यातच वर्षअखेरचा काळ असल्याने विभागांकडून होणाऱ्या खर्चावर अंकुश ठेवणे गरजेचे असल्याचे वित्त विभागाचे मत आहे. त्यामुळे आगामी काही आठवड्यांत सरकारी यंत्रणांमध्ये खरेदीविषयक प्रक्रिया पूर्णपणे मंदावलेली दिसण्याची शक्यता आहे.

# ट्रम्पचे तुणतुणे




भारताने थोड्याच दिवसांपूर्वी युरोपीय युनियन बरोबर फ्री ट्रेड समझोता केला होता. आतापर्यंत मग्रुरीने वागणाऱ्या अमेरिकेला यामुळे चिंता वाटणे स्वाभाविक होते. जाणकार आणि तज्ञ लोक तेव्हाच म्हणत होते की आता अमेरिकेबरोबर आपला व्यापारी करार होणारच होणार. अमेरिकेने अव्वाच्या सव्वा म्हणजे ५० टक्के आयात शुल्क लावले तरी आपण गप्प होतो, पण आपण अमेरिकेसमोर कोणत्याही प्रकारे झुकण्याचे मान्य केले नाही. बहुतेक यामुळेच अमेरिकेला आता व्यापार करार करणे गरजेचे वाटले असावे कारण नेहमी आगाऊ घोषणा करणाऱ्या ट्रम्पने यावेळीही तेच केले. ७२ वेळा ऑपरेशन सिंदूर आपणच थांबवले अशी दर्पोक्ती युक्त घोषणा करणाऱ्या ट्रम्पाने सर्वप्रथम ५० टक्के असलेला टेरीफ कर म्हणजेच आयात शुल्क १८% वर आणले. परंतु ट्रम्प म्हणजे शेवटी ट्रम्पच आहे. आपण जणू काही मेहेरबानी करतोय अशा थाटात अमेरिकेने टेरीफ दरात कपात केलेली आहे, असे भासवण्याचा त्याचा इरादा स्पष्ट झाला. ट्रम्पच्या मते भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही. अमेरिकेच्या सामानावर टॅरिफ लावणार नाही आणि महत्त्वाचे म्हणजे भारत अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलरचा माल खरेदी करेल. भारत काय करणार आहे हे ट्रम्प सांगतात पण आपल्याकडून कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त होत नाही. रशियाकडून मिळणारे स्वस्त तेल खरेदी न करता अमेरिकेचे महाग तेल घ्यावे हे काही पटत नाही. अमेरिकेपेक्षा रशिया हाच भारताचा जुना मित्र आहे. १९७१ साली अमेरिकेने पाकिस्तानला भारताविरुद्ध लढाईत मदत केली होती. आताही पाकिस्तानचा सेना प्रमुख मुनीर ट्रम्पच्या मांडीवर बसलेला आहे. आजही रक्षा सामग्रीच्या बाबतीत रशियाच आपल्याबरोबर राहील असे दिसून येत आहे. आता सध्याची आपली अमेरिकेतून होणारी आयात साधारणपणे ४५ अब्ज डॉलरची आहे. भारताची निर्यात ८० अब्ज डॉलरच्या वर आहे. पण ट्रम्पच्या आताच्या म्हणण्यानुसार भारत ५०० अब्ज डॉलरचे सामान अमेरिकेतून आयात करणार आणि त्यावर शून्य टेरिफ राहील. अमेरिकेच्या शेती मंत्रालयात असलेल्या ब्रूक रोलिन्स या बाईने ट्रम्पला धन्यवाद दिले आहेत त्याचे कारण या निर्यातीमुळे अमेरिकेचा शेतकरी मालामाल होईल असे तिचे म्हणणे आहे. तिकडे आपल्या पंतप्रधानांनी भारतीय शेतकऱ्यांचे जराही नुकसान होणार नाही अशी ग्वाही दिलेली आहे. त्यातल्या त्यात अमेरिकेतून येणाऱ्या सामानावर वीस ते सत्तर टक्के असलेले आयात शुल्क ट्रम्पच्या म्हणण्याप्रमाणे शून्य होणार आहे. एकूणच आता भारताने काय करावे हे सध्या ट्रम्प सांगत आहेत. मग प्रश्न असा आहे की आधीच श्रीमंत असलेल्या अमेरिकेला अधिक श्रीमंत करावे आणि अमेरिकेच्या आणि भारताच्या शेतकऱ्यांची धूळधाण करावी असे ट्रम्पचे गणित आहे. याबाबतीत दोन दिवस होऊनही आपल्यातर्फे स्पष्टपणे काहीच का सांगण्यात येत नाही हे मात्र न सुटणारे कोडे आहे. काहीही झाले तरी ट्रम्पला भारताने कुठून काय खरेदी करावे हे सांगण्याचा अधिकार कोणी दिला आहे? ट्रम्पच्या म्हणण्यानुसार त्यांच्या ज्या काही घोषणा आहेत त्या भारताच्या सार्वभौमत्वावर प्रहार करणाऱ्या आहेत. तेल खरेदी आणि कृषी मालाच्या बाबतीत आपल्या सरकारने लवकरात लवकर स्पष्टीकरण देणे अत्यंत गरजेचे आहे. पूर्वी फायद्यात असणारी अमेरिके सोबतची आयात निर्यात जर आपल्या भारताच्या दृष्टीने तोट्यात जात असेल, तर असा आतबट्ट्याचा व्यवहार आपण का करावा. बेफिकीर आणि लहरी ट्रम्पची हडेलप्पी आपण का सहन करावी आणि आपल्या देशातील शेतकऱ्यांना आपण वाऱ्यावर का सोडावे. हे सर्व प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. आपले सरकार याबाबतीत नक्कीच गंभीरपणे विचार करेल यात शंका घेण्याचे कारण नाही.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## एनसीपीच्या विलीनीकरणाचा कोणताही मुद्दा नव्हता

### तटकरेंचे स्पष्टीकरण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :



सुनेत्रा पवार यांचा शपथविधीला इतकी का घाई का झाली? त्यांच्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते. तसेच विलीनीकरणाची चर्चा अजित पवार यांच्यावर अंत्यसंस्कार पूर्ण होण्यापूर्वी का सुरू करण्यात आली? विलीनीकरणाचा आणि उपमुख्यमंत्रीपदाचा कसा संबंध येतो? हे जर मला सांगितले तर मी माझी भूमिका मांडेल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

तटकरे म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण असा काही मुद्दाच नव्हता. आमचा पक्ष हा एनडीएचा घटक पक्ष आहे, म्हणजे भाजपचा मित्रपक्ष आहे. आम्ही भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा सरकारमध्ये मंत्रिपदे आम्हाला देण्यात आली आम्ही एकत्रित लोकसभेची निवडणूक लढवली, आणि आताही सत्तेत सोबत आहोत त्यामुळे आमच्या विलीनीकरणाबद्दल भाजपसोबत चर्चा करणे गरजेचे आहे. २०१९ मध्ये मविआ स्थापन करत असताना सोनिया गांधींची परवानगी मागण्यात आलीच ना? युती-आघाडी करत असताना महत्त्वाच्या पक्षासोबत चर्चा करावी लागत असते.

तटकरे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचा विधीमंडळ नेता निवडतांना जनतेची आणि आमदारांची भावना लक्षात घेत आम्ही सुनेत्रा पवार यांची निवड केली आहे. त्यावर आशावेळी प्रश्न चिन्ह निर्माण करणे योग्य नाही. अजित पवार यांनी गेल्या ३ वर्षांत जो प्रचंड जनसंपर्क तयार केला त्यामुळे विधानसभेला जनतेने आम्हाला मोठी साथ दिली. आम्ही योग्यवेळी योग्य निर्णय घेतला आहे.

## दलाई लामा यांना पहिला ग्रॅमी पुरस्कार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :

लॉस एंजेलिस येथे ६८ व्या ग्रॅमी पुरस्कार २०२६ चे आयोजन करण्यात आले. पहिल्यांदाच तिबेटी आध्यात्मिक गुरु दलाई लामा यांनी बेस्ट ऑडिओ बुक, नरेशन आणि स्टोरीटेलिंग श्रेणीमध्ये ग्रॅमी पुरस्कार जिंकला.



हा पुरस्कार दलाई लामा यांना त्यांच्या ह्यमेडिटेशनः द रिफ्लेक्शन्स ऑफ हिज होलीनेस द दलाई लामा या अल्बमसाठी मिळाला. दलाई लामा हे तिबेटी बौद्ध धर्मातील सर्वोच्च आध्यात्मिक गुरूंचे पद आहे. १४ वे दलाई लामा ९० वर्षांचे तेनझिन आहेत. ६८ व्या ग्रॅमी अवॉर्ड्समध्ये अमेरिकन रॅपर केंड्रिक लेमरने बेस्ट रॅप अल्बमचा पुरस्कार जिंकून इतिहास रचला. केंड्रिक लेमर बेस्ट रॅप अल्बम श्रेणीत सर्वाधिक ७ वेळा ग्रॅमी जिंकणारे रॅपर बनले आहेत.

## विरोधी महिला खासदारांचा पीएच्या रिकाम्या खुर्चीला घेराव

# लोकसभेतील मोदींचे भाषण टळले

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ४ :

विरोधक खासदारांच्या सततच्या गदारोळामुळे बुधवारी लोकसभेचे कामकाज ४ वेळा तहकूब झाले. सायंकाळी ५ वाजता पंतप्रधान धन्यवाद प्रस्तावावर उत्तर देणार होते, परंतु विरोधक महिला खासदारांच्या गदारोळामुळे अध्यक्षा संध्या राय यांनी कामकाज उद्यापर्यंत तहकूब केले. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे संबोधन लांबले.




सायंकाळी ५ वाजता जेव्हा सभागृहाचे कामकाज सुरू झाले, तेव्हा विरोधक महिला खासदारांनी सत्ताधारी नेत्यांच्या खुर्च्यांना घेराव घातला. यात पंतप्रधान मोदींच्या खुचीर्चाही समावेश होता. महिला खासदारांच्या हातात मोठे फलक होते, ज्यावर 'जे योग्य आहे, ते करा' असे लिहिले होते.

या खासदार विरोधक खासदारांच्या निलंबनाचा निषेध करत होत्या. गदारोळामुळे अध्यक्षांनी कामकाज तहकूब केले. काही मंत्र्यांनी विरोधक खासदारांना जाण्यास सांगितले, त्यानंतर त्यांनी घेराव बंद केला.

## युमनाम खेमचंद सिंह बनले मणिपूरचे १३ वे सीएम



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :

भाजप नेते युमनाम खेमचंद सिंह मणिपूरचे १३ वे मुख्यमंत्री बनले आहेत. राज्यपाल अजय कुमार भल्ला यांनी बुधवारी संध्याकाळी लोकभवन येथे खेमचंद यांना गोपनीयतेची शपथ दिली. मैतेई समुदायाचे असलेले खेमचंद हे माजी मुख्यमंत्री बिरेन सिंग यांचे जवळचे मानले जातात.

नागा आमदार लोसी दिखो यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ते नागा पीपल्स फ्रंटचे सदस्य आहेत. कुकी समुदायाच्या सदस्या नेमचा किपगेन यांनीही उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांनी दिल्लीतील मणिपूर भवन येथून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आहेत. राज्यात पुन्हा एनडीए सरकार स्थापन झाले आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राज्यातील ३५६ दिवसांपासून लागू असलेली राष्ट्रपती राजवट उठवली. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी मणिपूरमधील मैतेई आणि कुकी समुदायांमधील वांशिक हिंसाचारामुळे तत्कालीन मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांनी राजीनामा दिला. १३ फेब्रुवारी २०२५ पासून राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. राज्याच्या गृहमंत्रीपदासाठी कोन्थोजम गोविंददास सिंह यांचे नाव चर्चेत आहे.

## अजितदादांच्या विमान अपघाताच्या चौकशीस विलंब अनाकलनीय

### सपकाळ यांची टीका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर अनेक स्तरातून शंका उपस्थित केल्या जात आहेत. अजित पवार यांचे शेवटचे संभाषण व्हायरल झाले आहे. पण ब्लॅकबॉक्स मधील संभाषण अद्याप जाहीर झालेले नाही आणि चौकशीही होत नाही. चौकशीसाठी लागणारा हा विलंब अनाकलनीय आहे, त्यामुळे संशय बळावत चालला आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

अजितदादांच्या विमान अपघात प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतलेली नाही. शपथविधीला जेवढी घाई केली तेवढी अपघाताच्या चौकशीसाठी करण्यात आली नाही. विमान अपघाताबाबत जनतेच्या मनात शंका असल्याने निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी करताना शपथविधीला घाई पण चौकशीला विलंब का? असा सवालही सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना केला.

अजित पवार यांच्यासारख्या शिस्तप्रिय लोकनेत्याच्या बाबतीत असा अपघात व्हावा हे पटत नाही. जोपर्यंत या अपघाताचा कार्यकारणभाव स्पष्ट होत नाही तोपर्यंत असे प्रश्न उपस्थित होतच राहणार. या अपघाताने अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत आणि सरकार हे प्रकरण ज्यापद्धतीने हाताळत आहे त्यावर शंका आणखी वाढत असल्याचे सपकाळ म्हणाले.

## शरद पवार, सुनेत्रा पवारांच्या भेटीत खलबते?



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ४ :

शरद पवार यांनी बारामती येथील सहयोग सोसायटी येथे जाऊन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची भेट घेतली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा रंगल्या असतानाच या भेटीतून काय बाहेर येणार? याकडे लक्ष आहे.

शरद पवार सहयोग सोसायटी येथे दाखल झाल्यानंतर त्यांनी अजित पवारांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या लाडक्या पुतण्याला काकांकडून श्रद्धांजली वाहताना संपूर्ण पवार कुटुंबीय भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान, सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होण्यापूर्वी हीच सहयोग सोसायटी राजकीय घडामोडींचे केंद्रबिंदू ठरले होते. अजित पवारांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात अनेक बदल झाले.

आता शरद पवार यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्यानंतर दोघांमध्ये काय चर्चा होते? विलीनीकरण होणार का? तसेच शरद पवार पुन्हा एकदा भाकरी फिरवणार का? याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे.

## अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला १२ हेक्टर जागा मंजूर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :

अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्न रुग्णालयाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने अमरावती जवळील आलियाबाद येथील ११.२९ हेक्टर जमिनीचा अंतिम ताबा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे सोपवण्यास महसूल विभागाने मंजुरी दिल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिली.

या जागेवर १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारले जाईल. या महाविद्यालयाला संलग्न ४३० रुग्णखाटांचे अद्ययावत रुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे.

## मनोज जरांगेंना ठार मारण्याची धमकी

■ वृत्तसंस्था, जालना, दि. ४ :

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना पुन्हा एकदा गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. सोशल मीडियात या प्रकरणी एक कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाली आहे. त्यात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडचे नाव आल्यामुळे धमकी देणारा व्यक्ती कराड समर्थक असल्याचा दावा केला जात आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर रान पेटवले होते. या प्रकरणी त्यांनी संतोष देशमुख हत्याकांडाचा मुद्दाही लावून धरला होता. या प्रकरणात वाल्मीक कराडला अटक झाली आहे. या घटनाक्रमामुळे धनंजय मुंडे व मनोज जरांगे यांच्यातील राजकीय वितुष्ट वाढले आहे.



या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांना फोनवरून कथित धमकी देण्यात आल्याची बातमी समोर आली आहे.

सदर कॉल रेकॉर्डिंगमध्ये एक व्यक्ती समोरच्या व्यक्तीशी संवाद साधताना थेट मनोज जरांगेंना गोळ्या घालून ठार मारण्याची भाषा करताना दिसून येत आहे. विशेषतः हा व्यक्ती पुन्हा धनंजय मुंडे व वाल्मीक कराड म्हणायचे नाही, अन्यथा तुलाही जीवे मारतो अशी धमकीही देताना ऐकू येत आहे.



## खर्च वाढला : शक्तिपीठ महामार्ग १५ हजार कोटींनी वाढून १ लाख १ हजार कोटींवर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असलेल्या शक्तिपीठ महामार्गाचा खर्च १५ हजार कोटींनी वाढून तब्बल १ लाख १ हजार कोटींवर पोहोचला आहे. शेतकऱ्यांच्या विरोधानंतर सरकारने या प्रकल्पाच्या आराखड्यात काही बदल केला आहे. या बदलामुळे हा खर्च वाढल्याचा दावा केला जात आहे.

शक्तिपीठ महामार्गाद्वारे राज्यातील साडेतीन शक्तिपीठांना जोडण्यात येणार आहे. पण कोल्हापूरसह राज्यातील विविध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला कडाडून विरोध केला आहे. गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने या प्रकल्पाच्या आराखड्यात काही बदल करण्याचे मान्य केले होते.

त्यानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) भूसंपादनाला विरोध करणाऱ्या कागल व हातकणंगले तालुक्याचा एक मोठा भाग या महामार्गातून वगळला. नांदेड, कोल्हापूर, सिंधुदुर्ग व धाराशिव जिल्ह्यातही काही बदल करण्यात आले.

प्रकल्पाच्या आरखड्यात सातारा जिल्हाही नव्याने जोडण्यात आला. यामुळे हा महामार्ग आता १२ ऐवजी १३ जिल्ह्यांतून जाणार आहे. परिणामी, या प्रकल्पाच्या खर्चात १५ हजार कोटींची वाढ झाली आहे. यामुळे या प्रकल्पाचा खर्च ८६ हजार कोटींवरून १ लाख १ हजार कोटींवर पोहोचला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग या प्रस्तावाची तपासणी करत आहेत. हा महामार्ग समृद्धी महामार्गासारखाच प्रवेश नियंत्रित शीघ्र संचार महामार्गात येतो. त्यामुळे या महामार्गावरून वेगवान प्रवास शक्य असल्यामुळे वेळेची अधिकाधिक बचत होण्यास मदत होणार आहे.

शक्तिपीठ महामार्ग करवीर, भुदरगड, आजरा, चंदगड मार्गे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्याला जोडला जाईल. नव्या आराखड्यानुसार, हा महामार्ग वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यांतील जाणार आहे.

## विमान अपघातावर प्रश्न विचारला तर भाजपला राग का?



■ **सोलापूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी पुन्हा एकदा भाजपवर निशाणा साधला आहे. अजित पवार हे राज्याची संपत्ती होते. त्यामुळे त्यांच्या विमान अपघातावर प्रश्न विचारला तर भाजपला राग का येतो? असे त्यांनी म्हटले आहे.

सुषमा अंधारे सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचारासाठी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथील एका प्रचारसभेत बोलताना भजापवर उपरोक्त प्रश्नांची सरबत्ती केली. त्या म्हणाल्या, मी प्रचाराचे काही बोलणार नाही. कारण, सोन्यासारखा माणूस आपल्यातून निघून गेला. अजितदादा राज्याची संपत्ती होते. ते म्हणतात ना की, लाख जावो, पण लाखोंचा पोशिंदा जगला पाहिजे. अजित पवारांच्या विमान अपघाताची माहिती उड्डयण नियामक मंडळाने दिली पाहिजे. पण भाजपच वेगळी उत्तरे देत आहे. या प्रकरणी अनेक प्रश्न अुत्तरीत आहेत. कुणाकडूनही ठोस उत्तर मिळत नाही. अजित पवारांचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. याचा भाजपला राग का येत आहे? आंतरराष्ट्रीय उड्डाण नियामक मंडळाने वर्षभरापूर्वी बंदी घातलेले विमान अजित पवारांच्या प्रवासासाठी का वापरले? अजित पवार स्वतःची फार काळजी घेत होते, ते हे विमान कसे वापरतील? असे विविध प्रश्न त्यांनी या प्रकरणी उपस्थित केलेत.

## मोदी-फडणवीसांना सांगितलेच पाहिजे, हा हट्ट कशासाठी?



■ **मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर कडाडून टीका करत महाराष्ट्राच्या राजकारणात नवा वाद निर्माण केला. अजित पवारांनी भाजपसोबत जाताना स्वतःचे विचार खुंटीला टांगले नाहीत; ते पक्ष चालवत होते, असे ठामपणे सांगत राऊतांनी पटेलांवर थेट निशाणा साधला. त्यांच्या मते, अजित पवारांचा पक्ष हा पवार कुटुंबाचा होता, तो कोणाच्याही छायेखाली चालणारा नव्हता. त्यामुळे पटेल यांनी अनावश्यक चिडचिड करू नये, असा टोला त्यांनी लगावला. याच वेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका करत प्रत्येक गोष्ट मोदी-फडणवीसांना सांगितलीच पाहिजे, हा हट्ट कशासाठी? असा सवाल उपस्थित केला. राऊतांनी उपरोधिक शैलीत विचारले, पटेलांना पवार कुटुंबाचा मुखिया केलं आहे का? त्यांच्या वक्तव्यातून प्रफुल पटेल यांच्याबाबतची नाराजी स्पष्ट दिसून आली. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस चालवत होते, त्यामुळे भाजपची परवानगी घेण्याचा प्रश्नच नव्हता, असे ते म्हणाले. दोन पक्षांत चर्चा झाली, तर त्याची माहिती सर्वांना असलीच पाहिजे हा अनाठायी आग्रह का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. पटेल हे मोदी-शाह यांचे भक्त असल्याचा आरोप करत, महाराष्ट्राला पटेल असंच करा, असा हल्लाबोल त्यांनी केला.

## गोळयांच्या अवैध विक्रीवर कारवाई करावी



■ **मुंबई :** यौन क्षमता वाढवणारी औषधे वैद्यकीय सल्ल्याशिवाय तसेच प्रिस्क्रिप्शनशिवाय सहजपणे विकल्या जात आहेत. अनेकदा अशी औषधे शरीरास हानिकारक ठरतात तसेच याच्या सेवनाने गंभीर परिणामही भोगावे लागतात. याच पार्श्वभूमीवर भाजप खासदार अजित गोपछडे यांनी थेट संसदेत लैंगिक क्षमता वाढवणाऱ्या गोळ्यांचा मुद्दा उपस्थित केला आहे. वैद्यकीय आणि मानसिकदृष्ट्या हे स्पष्ट आहे की, वैद्यकीय देखरेखीशिवाय या औषधांचे सेवन केल्याने हृदय व मानसिक आरोग्याला गंभीर हानी पोहोचू शकते. त्यामुळे लैंगिक क्षमता वाढवणाऱ्या औषधांबाबत सरकारने मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार अजित गोपछडे यांनी केली आहे. संसदेत बोलताना अजित गोपछडे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की, ही औषधे एनडीपीएस अधिनियमांतर्गत येत नसून असामाजिक तत्वांकडून याचा दुरुपयोग केला जात आहे. सभापती महोदय, सर्वच राज्य आणि केंद्र सरकारने संबंधित गोळ्यांच्या, औषधांच्या अवैध विक्रीवर कारवाई करावी. तसेच औषधांबाबत मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणी गोपछडे यांनी केली आहे.

# पुणे-मुंबई एक्सप्रेसवेवर गॅस टँकर पलटी

## १५ तास मार्ग ठप्प; एकाच लेनवरून वाहतूक सुरू



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**

मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपोलिन गॅस वाहतूक करणारा टँकर पलटी झाल्याने अभूतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाली. या अपघातामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक साधारण आठ तास पूर्णपणे ठप्प राहिली. मध्यरात्रीपर्यंत परिस्थिती धोकादायक असल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव महामार्ग दोन्ही बाजूंनी बंद ठेवण्यात आला होता. गॅस गळती सुरू असल्याने प्रशासनाने कोणतीही जोखीम न घेता वाहतूक थांबवण्याचा निर्णय घेतला. परिणामी हजारो वाहनचालक महामार्गावरच अडकून पडले.

मध्यरात्रीनंतर धोका काही प्रमाणात कमी झाल्यानंतर अपघातग्रस्त टँकर तिसऱ्या लेनवर हलवण्यात आला. त्यानंतर मुंबईच्या दिशेने केवळ एका लेनवरून वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र, वाहतुकीचा वेग अत्यंत मंद असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा कायम आहेत. सुमारे 15 तासांपासून या परिसरात भीषण परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. टँकरमधून होणारी गॅस गळती अद्याप पूर्णपणे थांबलेली नसल्याने खबरदारी म्हणून हालचालींवर बंधने ठेवण्यात आली आहेत.

या कोंडीमुळे अनेक प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. काही वाहनचालक पहाटे चार वाजल्यापासून तर काही जण रात्री तीन किंवा पाच वाजल्यापासून या ठिकाणी अडकले आहेत. दीर्घ प्रतीक्षेमुळे अनेकांची नियोजित फ्लाइट चुकल्याची माहिती समोर आली आहे. प्रवासाच्या नियोजनावर या घटनेचा मोठा परिणाम झाला असून लोकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. महामार्गावर इतक्या दीर्घकाळ अडकून पडल्याने प्रवाशांचा संयम सुटू लागल्याचे दिसून आले.

या दरम्यान काही कॅन्सरग्रस्त रुग्णही वाहतुकीत अडकले असल्याची माहिती मिळाली आहे. पाणी, अन्न आणि शौचालयांच्या सुविधांचा अभाव असल्याने प्रवाशांचे हाल झाले. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्ण यांना मोठा त्रास सहन करावा लागला. आपत्कालीन परिस्थितीत मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याची भावना वाहनचालकांमध्ये तीव्रतेने व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन सेवेच्या १३९ फेऱ्या रद्द

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**

पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर झालेल्या टँकर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून या घटनेचा परिणाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवांवर झाला आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, परिस्थितीचा आढावा घेऊन पर्यायी व्यवस्था उभारण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात येतील, असे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागाने कळविले आहे.

परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या अपघातानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यातील विविध विभागांमधील एकूण 139 बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या. यामध्ये 73 ई-शिवनेरी व 66 इतर बस फेऱ्यांचा समावेश आहे. तसेच, या एक्सप्रेस वेवर महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची एकूण 163 वाहने वाहतूक कोंडीत अडकली होती. यामध्ये सातारा विभागातील 46, सोलापूर विभागातील 36, पुणे विभागातील 20, सांगली विभागातील 18, कोल्हापूर विभागातील 13, पालघर विभागातील 12, ठाणे विभागातील 11 आणि मुंबई विभागातील 7 वाहनांचा समावेश आहे.

## प्रफुल्ल पटेलांचे नाव अनावधानाने येतेच कसे?

## भरत गोगावलेंचा सुनील तटकरेंना सवाल



■ **वृत्तसंस्था, रायगड, दि. ४ :**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अकाली निधनाने राज्यावर शोककळा पसरली. त्यांच्या निधनानंतर अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यानंतर आता पक्षाच्या अध्यक्ष पदावरून जोरदार चर्चा रंगली आहे. त्यात केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी एका मुलाखतीत प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादीचे अध्यक्ष ठरल्याचे म्हटले होते. त्यानंतर यावरून राजकारण काहीसे तापल्याचे पाहायला मिळत आहे. आता यावरून शिवसेना शिंदे गटाचे नेते भरत गोगावले यांनी देखील प्रतिक्रिया देत थेट सुनील तटकरेंना सवाल केला आहे.

पियुष गोयल यांच्याकडून मुलाखतीत बोलताना प्रफुल्ल पटेल यांचे नाव अनावधानाने आल्याचे सुनील तटकरे यांनी म्हटले आहे. यावर भरत गोगावले यांनी टोला लगावला आहे. ते म्हणाले, अनावधानाने नाव येतेच कसे? असा सवाल करत गोगावले यांनी पुन्हा एकदा तटकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. रायगडमध्ये गोगावले आणि तटकरे यांचा वाद सर्वश्रुत आहे.

भरत गोगावले म्हणाले, पूर्वकल्पी ठरलेले असताना असे अनावधानाने कसे नाव येते? अजित दादा निघून गेल्याला अजून 12 दिवस देखील झाले नाहीत. तोवरच सगळ्या पदांच्या नेमणूक सुरू झाल्या, असे म्हणत गोगावले यांनी टीका केली आहे. दरम्यान, पियुष गोयल यांनी केलेल्या विधानानंतर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील ट्विट करत टीका केली होती. त्यांनी म्हटले होते की, राष्ट्रवादी कॉंग्रेस या मराठमोळ्या पक्षाचा अध्यक्ष कोणीही पाटील असावा, पटेल नसावा, असे म्हणत त्यांनी त्यांची स्पष्ट भूमिका मांडली होती. अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची रायगडमध्ये पहिली सभा संपन्न होत असून रायगडच्या इंदापूर येथे जिल्हा परिषद निवडणुकांसाठी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजितदादांची राष्ट्रवादी पुन्हा कामाला लागली असल्याचे पाहायला मिळत आहे.

## नाशिकमध्ये गिरीश महाजनांविरोधात बहुजन समाज आक्रमक

■ **महासागर प्रतिनिधी**
**नाशिक, दि. ४ :**

नाशिकमध्ये प्रजासत्ताक दिनी झालेल्या शासकीय कार्यक्रमात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेतल्याच्या मुद्द्यावरून मंत्री गिरीश महाजन अडचणीत सापडले आहेत. या घटनेनंतर त्यांनी माफी मागितली असली, तरी बहुजन समाजातील नाराजी ओसरलेली दिसत नाही. या पार्श्वभूमीवर आज नाशिकमध्ये महाजनांविरोधात मोठा मोर्चा काढण्यात आला. नाशिकरोड ते शालिमार या मार्गावर निघालेल्या या आंदोलनात बहुजन समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला. घोषणाबाजी, फलक आणि निदर्शनांमुळे शहरात राजकीय वातावरण तापलेले पाहायला मिळाले. आंबेडकरांचा उल्लेख न झाल्याने झालेला संताप या मोर्च्यातून स्पष्ट दिसून आला.

या मोर्च्यामुळे नाशिक शहरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. आंदोलनकर्त्यांनी संविधानाचा सन्मान राखण्याची मागणी करत महाजनांच्या वक्तव्याविरोधात तीव्र निषेध नोंदवला. महाजनांनी जाहीरपणे माफी मागूनही बहुजन समाजाची भूमिका कठोरच राहिल्याचे चित्र होते. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे होते की, प्रजासत्ताक दिनासारख्या महत्त्वाच्या दिवशी डॉ. आंबेडकरांचे नाव न घेणे ही गंभीर बाब आहे आणि याबाबत अधिक संवेदनशीलता अपेक्षित होती. या घटनेने केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिक स्तरावरही चर्चा रंगली.

एकीकडे महाजनांविरोधात बहुजन समाज आक्रमक झाला असताना, दुसरीकडे पक्षांतर्गत राजीनाम्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती महाजनांसाठी दुहेरी आव्हान ठरत आहे. सामाजिक स्तरावरील रोष आणि संघटनात्मक स्तरावरील अस्वस्थता या दोन्ही गोष्टी एकाच वेळी समोर आल्याने नाशिकमधील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. पुढील काही दिवसांत या प्रकरणांवर पक्ष आणि प्रशासन कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## स्नॅपचॅटवर ॲसिड हल्ल्याची धमकी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**

मुंबईच्या अंधेरी पश्चिम भागातील लोखंडवाला परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका 29 वर्षीय तरुणाने एका महिलेच्या अंगावर कार चढवत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या संदभार्तील सीसीटीव्ही फुटेज देखील समोर आले आहे. या प्रकरणी ओशिवारा पोलिसांनी आरोपी मोहम्मद शकील शेखवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. ही घटना लोखंडवाला परिसरातील अरीना बिल्डिंगच्या गेटवर रात्री 9.30 च्या सुमारास घडली. आरोपी मोहम्मद शेख याने मॉडेल असलेल्या मैत्रिणीला स्नॅपचॅटवर ॲसिड हल्ल्याची धमकी दिली होती. या धमकीबाबत विचारणा करण्यासाठी महिलेने आरोपीला तिच्या बिल्डिंगच्या गेटवर बोलावले होते. आरोपी तरुणाने त्याच्या स्कोडा कारने महिलेला जोरदार धडक देत काही अंतर फरफटत नेले.

## लाडक्या बहिणींना दिलासा

## थकीत ४५०० रुपये एकाचवेळी खात्यात




■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**

राज्यातील महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींना मोठा दिलासा देणारी माहिती महिला व बालविकास विभागाकडून समोर आली आहे. ई-केवायसी प्रक्रियेमुळे अनेक महिलांचे थकीत राहिलेले तीन महिन्यांचे हप्ते आता एकत्रित स्वरूपात देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांचा एकूण 4500 रुपयांचा हप्ता पात्र महिलांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. या निर्णयामुळे गेल्या काही महिन्यांपासून पैसे न मिळाल्याने त्रस्त झालेल्या महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या योजनेत राज्यातील महिलांना दरमहा 1500 रुपयांची आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. या योजनेचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा उपक्रम मानला जातो. निवडणुकीत या योजनेचा महायुती सरकारला राजकीय लाभ झाल्याचेही चित्र दिसून आले. मात्र, ई-केवायसी प्रक्रियेमुळे अनेक लाभार्थींना नियोजित वेळेत हप्ते मिळाले नाहीत, त्यामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

ई-केवायसी पूर्ण न झाल्यामुळे अनेक महिलांचे हप्ते थांबले होते. काही महिलांनी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया पूर्ण करूनही त्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नव्हते. त्यामुळे महिलांनी संबंधित कार्यालयांमध्ये जाऊन नाराजी व्यक्त केली. काही ठिकाणी तर लाभार्थी महिला रस्त्यावर उतरून आंदोलन करतानाही दिसून आल्या. पैसे का येत नाहीत, याबाबत स्पष्टता नसल्याने महिलांमध्ये संभ्रम आणि असंतोष वाढत होता.

# स्वयंरोजगाराला प्रोत्साहनासाठी राज्य शासन तत्पर



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**

जगतिक पातळीवर विविध क्षेत्रात अत्यावश्यक मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता दर्जेदार कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन तत्पर आहे. राज्यात लागू करण्यात आलेली 'पीएम सेतू योजना' आणि ''मुख्यमंत्री महाफंड स्वयंरोजगार योजना' हा त्याचाच प्रमुख भाग असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

कुर्ला येथील डॉन बॉस्को इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य स्पर्धेचे उद्घाटन कौशल्य मंत्री लोढा यांच्या हस्ते झाले. नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनएसडीसी) आणि महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटी (एमएसएसडीसी) यांच्या विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील युवकांसाठी कौशल्य विकासाचा भव्य आणि प्रेरणादायी दृष्टिकोन मांडत तरुणांना नवी दिशा दिली आहे.

महाराष्ट्रालाही त्याचा लाभ होणार असून पहिल्या टप्प्यात २४२ कोटी खर्च करून छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नागपूरच्या आयटीआयचे आधुनिकीकरण होणार आहे. हाच दृष्टिकोन राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिमान नेतृत्वाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे. या योजनेतून राज्यभरातील स्टार्टअप्स सुरु करणाऱ्या ५ लाख तरुणांना सामायिक ऑनलाईन चाचणीद्वारे निवड करून ५ लाखांची आर्थिक मदत मिळवून दिली जाणार असून त्याच्या व्याजाचा अर्धा भार राज्य शासन उचलणार असल्याची माहिती कौशल्य मंत्री लोढा यांनी यावेळी दिली. चीनमधील शांघाय येथे या वर्षी जागतिक कौशल्य स्पर्धा होणार आहे. त्याकरिता यांत्रिकी, वीज संच मांडणी, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी, औद्योगिक तंत्रज्ञान, सायबर सिक्युरिटी आणि सामाजिक सुरक्षा तंत्रज्ञान या सहा कौशल्य क्षेत्रांशी संबंधित कौशल्य स्पर्धांचे देशभरात आयोजन करण्यात येत आहे.

## राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतला नदीजोड प्रकल्पांतील कामांचा आढावा



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पांतील कामांना गती देण्याच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सविस्तर आढावा घेतला.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प, दमणगंगा-एकदरे- गोदावरी नदीजोड प्रकल्प तसेच कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भीमा नदी खोऱ्यात वळविण्यासाठी सुरू असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा यावेळी घेण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृह येथे नदीजोड प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोकणातील जलसमृद्ध खोऱ्यांमधील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून नाशिक व मराठवाडा भागातील पाणीटंचाई दूर करणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले. जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले की, पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील अतिरिक्त जमिनी पर्यावरणपूरक व पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करून महामंडळाचे उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यात येणार आहेत.

## मैत्रिणीला फोन केल्याने कोयत्याने हल्ला

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ४ :**

जुन्या मैत्रिणीला फोन लावण्यावरून झालेल्या वादातून एका मित्राने दुसऱ्या मित्रावर कोयत्याने सपासप वार केल्याची भयंकर घटना पुण्यातील भारती विद्यापीठ परिसरात घडली आहे. या घटनेत एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेचा एक अंगावर काटे आणणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यात आरोपी कोयत्याने सपासप वार करताना दिसून येत आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना 2 फेब्रुवारी रोजी रात्री 8 च्या सुमारास घडली आहे. चेतन चव्हाण असे जखमी तरुणाचे नाव असून, आदित्य कांबळे असे त्याच्यावर हल्ला करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे पुण्यातील गुन्हेगारीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, आदित्य कांबळे व चेतन चव्हाण हे एकमेकांचे चांगले मित्र आहेत. ते 2 फेब्रवारी रोजी सायंकाळी भारती विद्यापीठ परिसरातील एका ऊसाच्या गाडीजवळ उभे होते. गप्पा मारताना त्यांच्या एका जुन्या मैत्रिणीची आठवण निघाली. या मैत्रिणीला फोन करण्यावरून दोघांत शाब्दिक वाद झाला. त्यानंतर हा वाद एवढा टोकाला पोहोचला की, आदित्य कांबळेने काही कळण्याच्या आत चेतनवर कोयत्याने हल्ला करण्यास सुरुवात केली. त्यात चेतनच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याच्यावर भारती विद्यापीठ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अचानक घडलेल्या घटनेमुळे विद्यापीठ परिसरात एकच धावपळ उडाली.

## मुंबई विमानतळावर दोन विमानांच्या पंखांची धडक



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**

मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन विमानांचा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. एअर इंडिया आणि इंडिगो या दोन विमानांच्या पंखांची धडक झाली असून यात सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही. परंतु, या घटनेने विमान सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना गर्दीच्या वेळी टॅक्सीवेवर घडली, ज्यात प्रवाशांनी भरलेल्या दोन लहान विमानांचा समावेश होता. विमानतळ सूत्रांनुसार, गर्दीच्या धावपट्टीवरून मार्गक्रमण करत असताना दोन्ही विमानांचे पंखांचे टोक एकमेकांना घासले गेले. यात पंखांचे किरकोळ नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

अधिकची माहिती अशी की, यातील एअर इंडिया अक 2732 हे विमान मुंबईहून कोईम्बतूरसाठी उड्डाण करण्याच्या तयारीत होते. विमान प्रस्थानासाठी आपल्या गेटवरून ते पुढे जात होते. तर इंडिगो 6ए791 हे विमान हैदराबादहून आले होते. सुरक्षित लँडिंगनंतर विमान आपल्या निर्धारित पार्किंग बेकडे जात होते. याच वेळी दोन्ही विमानांचे पंख एकमेकांना धडकले.

# महाराष्ट्राच्या शेतीला अमेरिकन बळ; प्रगत तंत्रज्ञानासाठी सरकारतर्फे दौरा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४ :**

महाराष्ट्रातील शेतीला आधुनिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील कृषी उत्पादन, उत्पादकता आणि जागतिक बाजारपेठेतील निर्यात क्षमता वाढवण्यासाठी राज्य सरकारचे एक उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ थेट अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे. विपणन व शिष्टाचार मंत्री जयकुमार जितेंद्रसिंह रावल यांच्या नेतृत्वाखाली हा दौरा पार पडणार असून, याद्वारे महाराष्ट्रातील शेतीला जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान मिळवून देण्याचा सरकारचा मानस आहे.

येत्या ९ ते १६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान अमेरिकेत होणाऱ्या जगप्रसिद्ध नॅशनल फार्म मशिनरी शो २०२६ ला हे प्रतिनिधीमंडळ भेट देणार आहे. या प्रदर्शनात जगातील सर्वात प्रगत कृषी यंत्रसामग्री आणि स्वयंचलित तंत्रज्ञानाचे प्रदर्शन भरवले जाते. प्रिसिजन फार्मिंग (अचूक शेती), आधुनिक कापणी यंत्रे आणि मानवी श्रमाचा वापर कमी करणाऱ्या रोबोटिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून ते महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीनुसार कसे राबवता येईल, याचा आराखडा या दौऱ्यात तयार केला जाणार आहे. याचा थेट फायदा राज्यातील शेवटच्या शेतकऱ्याला तंत्रज्ञान स्वरूपात देण्याचे उद्दिष्ट आहे.

अमेरिकेतील प्रगत तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा समन्वय साधून आपल्या शेतकऱ्याला जागतिक स्पर्धेत सक्षम करणे हेच मुख्य ध्येय आहे. अमेरिकेतील नॅशनल फार्म मशिनरी शो द्वारे प्रिसिजन फार्मिंग आणि स्वयंचलित यंत्रसामग्री महाराष्ट्रात आणून मजुरांची टंचाई व वाढता खर्च यावर मात करण्याचा प्रयत्न आहे. केवळ उत्पादनावर लक्ष न देता, वॉशिंग्टन डी.सी. मधील बैठकांमधून महाराष्ट्रातील शेतीमालासाठी अमेरिकन बाजारपेठेची दारे उघडणे हा मोठा धोरणात्मक बदल आहे. काढणीपश्चात प्रक्रिया आणि प्रगत लॉजिस्टिक्सवर लक्ष केंद्रित केल्यामुळे शेतीमालाचे नुकसान कमी होऊन शेतकऱ्यांच्या हातात अधिक नफा पडेल. या संपूर्ण दौऱ्याचा खर्च महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ करणार असून हा दौरा केवळ यंत्रसामग्री पाहण्यापुरता मर्यादित नसून, महाराष्ट्रातील शेतीमालाला हक्काची जागतिक बाजारपेठ मिळवून देणे हा यामागचा मुख्य उद्देश असून वॉशिंग्टन डी.सी. येथे होणाऱ्या उच्चस्तरीय बैठकांमध्ये महाराष्ट्रातील फळे, भाजीपाला आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांच्या नियातीर्साठी रोडमॅप तयार केला जाईल. यामुळे थेट अमेरिकेच्या बाजारपेठेत महाराष्ट्राचा ब्रँड पोहोचण्यास मदत मिळणार आहे.

# अमरावतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी
# अखेर आलियाबादची जागा प्रदान

## जागेच्या प्रश्नाला अखेर फुलस्टॉप



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.4 )** – गेल्या काही वर्षांपासून चर्चेत असलेल्या येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्न निकाली काढण्यात आला असून कोंडेश्वर नजीकच्या आलियाबाद येथील 11.29 हेक्टर जागेचा अंतिम ताबा वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाला प्रदान करण्यात आला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'ट्वीट' करून ही माहिती दिली आहे.

आलियाबाद येथील सर्व्हे क्रमांक 9/1 मधील 11.29 हेक्टर जागेवर 100 विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्नित 430 खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यासाठी आरोग्य व वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय आहे. या निर्णयामुळे विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतील.

अमरावती व परिसरातील नागरिकांना आधुनिक आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होईल. अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून मला अभिमान वाटतो. या जिल्ह्यातील नागरिकांनी ही मागणी केली होती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मिळू शकले. आज जागेच्या निकड मार्गी लागली. पालकमंत्री म्हणून मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार मानतो, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

### मोसिकॉल च्या जागेसाठीही दिले होते निवेदन

शहराच्या मध्यवस्तीत असलेली 'मोसिकॉल'ची (महाराष्ट्र राज्य तेलबिया व्यापार व औद्योगिक महामंडळ) 24 एकर जमीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अधिग्रहित करावी, अशी मागणी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख प्रदीप बाजड यांनी केली होती. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या रुग्णांना तत्पर सेवा मिळण्यासाठी मध्यवस्तीत जागा असणे आवश्यक आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) आणि जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) ही दोन्ही मोठी रुग्णालये शहराच्या मध्यभागी आहेत. मोसिकॉलची 24 एकर जमीन या दोन्ही रुग्णालयांपासून जवळच आहे, असे त्यांचे म्हणणे होते.

### आमदार संजय खोडकेंचा होता आक्षेप

आलियाबाद येथील जागा शहरापासून 15-20 किलोमीटर लांब असल्याने तेथे रुग्णांना जाणे गैरसोयीचे होणार आहे. त्यामुळे या जागेसंदर्भात तत्कालीन समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत फेरविचार करावा तसेच सोयीची ठरणाऱ्या नागपूर महामार्गालगतच्या जागेचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संजय खोडके यांनी हिवाळी अधिवेशनात केली होती. वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी साधारणपणे 600 ते 700 कोटी रुपये लागणार आहेत. मात्र महाविद्यालय हे शहरापासून दूर असल्यास तिथे रुग्णच पोहचू शकणार नसल्याने एवढा मोठा खर्च व्यर्थ जाईल, असे संजय खोडके यांनी सांगितले होते.

# जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचे कंत्राट वादाच्या भोवऱ्यात

## माजी आमदार विरेंद्र जगताप यांची जनहित याचिका




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.4 )** – अमरावतीजिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे कंत्राट वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या कंत्राटाविरुद्ध धामणगाव चांदूर रेल्वे येथील माजी आमदार प्रा. विरेंद्र जगताप यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. कंत्राट प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

राज्य सरकारने जिल्हा परिषदेसाठी चार माळ्याची नवीन इमारत बांधण्यासाठी 49 कोटी 83 लाख 98 हजार रुपये मंजूर केले आहेत. या प्रकल्पाच्या कंत्राट प्रक्रियेत आर. पी. मंधडा. अजयकुमार हेडा व श्री. मुंधडा या तीन कंत्राटदारांनी बोली दिली होती. परंतु, श्री. मुंधडा यांनी आवश्यक दस्तऐवज दिले नाही. त्यामुळे इतर दोघेच शर्यतीत होते. त्यापैकी आर. पी. मुंधडा यांनी 36 कोटी 27 लाख 10 हजार 702 रुपयांची सर्वात कमी बोली दिल्यामुळे त्यांना 16 फेब्रुवारी 2024 रोजी कार्यादेश जारी करण्यात आला. या कंत्राटदाराला एवढा मोठा प्रकल्प राबवण्याचा अनुभव नाही. त्यांना कंत्राट देण्यासाठी विविध प्रकारची अनियमितता करण्यात आली. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व वादग्रस्त कार्यादेश रद्द करण्यात यावा, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे.

### राज्य सरकारकडे मागितले उत्तर

या प्रकरणावर मंगळवारी न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यासमक्ष सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने ग्राम विकास विभागाचे सचिव, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नोटीस बजावून याचिकेतील आरोपांवर सहा आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्त्यातर्फे भेंट रुग्वेद दोरे यांनी बाज मांडली.

# जलयुक्त शिवारच्या कामांचे त्रयस्त संस्थांकडून ऑडिट

## निष्पक्ष मूल्यांकनासाठी दोन अभियांत्रिकी संस्थांची निवड



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.4 )**– महत्त्वाकांक्षी 'जलयुक्त शिवार अभियान 2.0'अंतर्गत जिल्ह्यातील विविध जलसंधारण कामांची गुणवत्ता आणि परिणामकारकतेची त्रयस्त संस्थेमार्फत तपासणी करण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षते खालील समितीने या कामांच्या मूल्यांकनासाठी दोन अभियांत्रिकी संस्थांची निवड केली असून, प्रत्यक्ष स्थळपाहणीला सुरुवात झाली आहे.

जिल्ह्यात झालेल्या कामांचे निष्पक्ष मूल्यांकन व्हावे, यासाठी सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावती आणि प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा या दोन संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थांचे तज्ज्ञ पथक जिल्ह्यातील प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांचे ऑडिट करीत आहेत. अभियानांतर्गत विविध शासकीय यंत्रणांमार्फत करण्यात आलेली कामे या मूल्यांकनाच्या कक्षेत आहेत. यात नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट नाला बांध व त्यातील गाळ काढणे, विहीर पुनर्भरण व रिचार्ज शाफ्टची कामे, शेततळे, समतल चर आणि गॅबियन बंधारे, नदी पुनरुज्जीवन व खोलीकरणासह डोह निर्मिती यांचा समावेश आहे. मूल्यांकन केवळ कामाची भौतिक स्थिती तपासण्यापुरते मर्यादित नसून, त्यात तांत्रिक बाबींना विशेष महत्त्व दिले जात आहे. यामध्ये मुख्यत्वे कामाची गुणवत्ता, कामाची भौतिक स्थिती. अभियानापूर्वीची भूजल स्थिती, अभियानानंतरची भूजल स्थिती, गाव जल परिपूर्ण झाले असल्याबाबत सविस्तर अहवाल शासनास सादर केला जाणार आहे.

# अमरावती-मुंबई एक्सप्रेस पुढील तीन महिने दादरपर्यंतच धावणार



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.4 )**– छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी)च्या पुनर्विकासामुळे भविष्यात प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा मिळणार असल्या तरी सध्या मात्र या तात्पुरत्या बदलामुळे विशेषत: विदर्भातून येणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. अमरावती एक्सप्रेस आणि बल्लारशहाहून निघणारी नंदीग्राम एक्सप्रेस प्रवाशवांना पुढील तीन महिने अडचणींचा सामना करावा लागणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथील पुनर्विकास कामामुळे विदर्भातून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना पुढील तीन महिने बदललेल्या वेळापत्रकाचा सामना करावा लागणार आहे. रेल लँड डेव्हलपमेंट अथॉरिटीमार्फत सीएसएमटी स्थानकावर सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांमुळे अमरावती व बल्लारशहा येथून निघणाऱ्या दोन प्रमुख रेल्वेगाड्या सीएसएमटीऐवजी दादर स्थानकापर्यंतच धावणार आहेत. ही व्यवस्था 1 फेब्रुवारीपासून 26 एप्रिल 2026 पर्यंत लागू राहणार आहे. सीएसएमटीवरील फलाट क्रमांक 16 व 17 येथे पुनर्विकासाशी संबंधित महत्त्वाची कामे हाती घेण्यात आली आहेत.

# अत्यंत धोकादायक 'श्री रामचंद्र दीक्षित चॅरिटेबल ट्रस्ट'ची इमारत महानगरपालिकेकडून जमीनदोस्त

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.4 )**– शहरातील पश्चिम झोन क्रमांक 5 अंतर्गत येणाऱ्या भाजीबाजार, साबनपुरा परिसरात असलेल्या एका अत्यंत जीर्ण व धोकादायक इमारतीवर अमरावती महानगरपालिकेने आज कठोर कारवाई केली. 'श्री रामचंद्र दीक्षित चॅरिटेबल ट्रस्ट'ची ही इमारत नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पूर्णपणे पाडण्यात आली. इंद्रभुवन थिएटरजवळील साबनपुरा भागात असलेली ही इमारत दीर्घकाळापासून अत्यंत जीर्ण अवस्थेत होती. इमारतीच्या ढासळलेल्या संरचनेमुळे परिसरातील नागरिकांना तसेच बाजारपेठेतील व्यापाऱ्यांना मोठा धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली 4 फेब्रुवारी 2026 रोजी ही धडक कारवाई करण्यात आली. ही कारवाई उपअभियंता विवेक प्र. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. मोहिमेदरम्यान पोलीस प्रशासन व महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे भरीव सहकार्य लाभले.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

**अमरावती**– पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे गुरुवार, दि. 5 फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, बावनकुळे यांचे सकाळी 11.30 वाजता अमरावती विमानतळावर आगमन होईल. दुपारी 12 ते 3.30 या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात राखीव आहे. त्यानंतर दुपारी 4 वाजता अमरावती विमानतळावरून हेलिकॉप्टरने नागपूरकडे रवाना होतील.

# ग्रामीण पोलीस दलात प्रशासकीय बदल्या

## 20 अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या नेमणुका



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.4 )** – प्रशासकीय कारणास्तव अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस दलातील पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाच्या एकूण 20 अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या बदल्या व नेमणुका करण्यात आल्या आहेत. जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळास प्राप्त अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी हे आदेश निर्गमित केले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जातही मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आले आहेत. विविध पोलीस ठाणे, सायबर पोलीस स्टेशन, स्थानिक गुन्हे शाखा तसेच पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील वाचक शाखांमध्ये प्रभारी नेमणुका करण्यात आल्या आहेत. सर्व बदल्या तात्पुरत्या स्वरूपातील असून संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ पदभार स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### कुणाची कुठे बदली / नेमणूक

पोनि प्रशांत मसराम : चिखलदरा नियंत्रण कक्ष
पोनि आधारसिंग सोनोने : नियंत्रण कक्ष जिल्हा विशेष शाखा
पोनि अशोक लांडे : नियंत्रण कक्ष सायबर पोलीस स्टेशन
पोनि नितीन देशमुख : नियंत्रण कक्ष जिल्हा वाहतूक शाखा
पोनि सतीश पाटील : जिल्हा विशेष शाखा नियंत्रण कक्ष
सपोनि. अमन सिरसट : शिरजगाव कसबा अपर पोलीस अधीक्षक कार्यालय (वाचक)
सपोनि. सचिन पवार : स्थानिक गुन्हे शाखा कुन्हा
सपोनि. संजय आत्राम : परतवाडा मंगरूळ चव्हाळ
सपोनि. शरद आहेर : चांदूर रेल्वे मंगरूळ दस्तगीर
सपोनि. अभय चौथनकर : दर्यापूर पथ्रोट
सपोनि. वैभव महांगरे : खोलापूर पोलीस अधीक्षक कार्यालय (वाचक)
सपोनि. महेंद्र गवई : शिरजगाव कसबा सायबर पोलीस स्टेशन
सपोनि. अनुप वाकडे : कुन्हा पोलीस अधीक्षक वाचक
सपोनि. राजीव हाके : मंगरूळ चव्हाळ चांदूर रेल्वे
सपोनि. गौतम इंगळे : मंगरूळ दस्तगीर अपर पोलीस अधीक्षक वाचक
सपोनि. सचिन पुंडगे : पथ्रोट दर्यापूर
सपोनि. सुरेश मान्टे : धारणी चिखलदरा
सपोनि. विलासकुमार सानप = सायबर चांदूर रेल्वे
सपोनि. मनिष दुबे : दर्यापूर नियंत्रण कक्ष
सपोनि. अमोल मुडे : तिवसा स्थानिक गुन्हे शाखा


# ग्रामपंचायत कार्यालय गणोजा देवी

## पंचायत समिती भातकुली, जि.अमरावती

ग्रामपंचायत कार्यालय गणोजा देवी पंचायत समिती, भातकुली ता. भातकुली जि.अमरावती यांचे मार्फत १५ वा वित्त आयोग/दलीत वस्ती सुधार योजना/जनसुविधा योजने अंतर्गत खालील कामाची मोहरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम तथा साहित्य खरेदीची विभागाची वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा सरपंच/सचिव ग्रामपंचायत कार्यालय गणोजा देवी कडून देण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | कामाची किंमत | अनामत रक्कम | कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक | निविदा स्विकारण्याची दिनांक | निविदा उघडण्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोंडवाडा दुरुस्ती | १५वा वित्त आयोग २०२५-२६ | २,००,०००/- | १ % | दि. ५/०२/२०२६ कार्यालयीन वेळेत | दि.०५/०२/२०२६ ते ११/२/२०२६ कार्यालयीन वेळेत | आगामी सभेत |
| २ | ग्राम पंचायत आवारात पेव्हींग ब्लॉब बसविणे | १५वा वित्त आयोग २०२५-२६ | १,८६,५५८/- | १ % | | | |
| ३ | वार्ड क्र. २मध्ये भूमिगत गटारे बांधकाम | १५वा वित्त आयोग २०२५-२६ | २,००,०००/- | १ % | | | |
| ४ | डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ वॉल कम्पाऊंड करणे. | १५वा वित्त आयोग २०२५-२६ | २,००,०००/- | १ % | | | |
| ५ | वॉर्ड क्र. २ मध्ये कॉंक्रिट रस्ता व नाली बांधकाम करणे | अनु. जाती व.घ. विकास करणे | ५,००,०००/- | १ % | | | |

टिप :-
१) निविदाच्या अटी व शर्ती ग्रा.पं. कार्यालय गणोजा देवी ता. भातकुली जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.
२) निविदा ह्या दोन लिफाफे पद्धतीने सादर करावा.
३) निविदा स्विकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहे.
४) कामाचा कालावधी ३ महिन्याचा राहिल
५) कोऱ्या निविदेची किंमत प्रत्येकी ५०० रूपये राहिल.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत गणोजा देवी**
**ता. भातकुली जि.अमरावती.**

# विलिनीकरण रोखणारे नायक की खलनायक?

**स्टेटलाईन**
**डॉ. सुकृत खांडेकर**

अजित पवार यांचा विमान अपघातात झालेल्या मृत्यूनंतर ज्या घाईने विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदावर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची निवड झाली व ज्या वेगाने उपमुख्यमंत्रीपदाची शपथ त्यांना देण्यात आली, ती तत्परता पाहून सारा महाराष्ट्र आश्चर्यचकीत झाला. अजितदादा यांच्या निधनानंतर पोरका झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार किंवा जयंत पाटील ताबा मिळवतील, अशा भयगंडाने अजितदादांच्या पक्षातील अनेकांना पछाडले आहे. खरं तर अजित पवार आणि शरद पवारांच्या पक्षाचे नेते यांच्यात गेल्या काही महिन्यांपासून विलिनीकरणाची चर्चा चालू होती. पण आम्हाला त्यातले काहीच ठाऊक नाही, असे सांगत प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, छगन भुजबळ किंवा धनंजय मुंडे हात वर करीत आहेत. विलिनीकरण म्हणजे, कोणी कोणाच्या पक्षात सामील व्हायचे ? असा प्रश्न प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी विचारला आहे.

---------------

सन २०२४ मधे झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत अजित पवार व शरद पवार यांचे पक्ष एकमेकांच्या विरोधात लढले होते. शरद पवार हे भाजपाच्या विरोधात तर अजित पवार हे भाजपाला सोबत घेऊन लढले होते.

लोकसभा निवडणुकीत अजितदादांच्या पक्षाला मोठे अपयश आले तर विधानसभा निवडणुकीत शरद पवाराच्या पक्षाला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. दोन्ही पक्षांनी एकत्र यावे यासाठी अजितदादांनी पुढाकार घेतला. दोन्ही पक्षांनी महापालिकेच्या निवडणुका एकत्रितपणे पण आपापल्या चिन्हावर लढवल्या पण कोणालाच लाभ झाला नाही. भाजपाच्या झंझावातापुढे पुणे आणि पिंपरी चिंचवडमधेही आपला निभाव लागत नाही, हे काका- पुतण्याला कळून चुकले.

जिल्हा परिषद निवडणुकीत अजित पवारांच्या घड्याळ या चिन्हावर दोन्ही पक्षांचे उमेदवार मैदानात उतरले आहेत. जर विलिनीकरण हा मुद्दा नसता तर महापालिका किंवा जिल्हा परिषद निवडणुका एकत्रितपणे व एकाच चिन्हावर लढविण्याचा त्यांनी निर्णय घेतला असता का?

जुलै २०२३ मधे अजित पवार बंडाचा झेंडा फडकावून चाळीस आमदारांसह भाजपासोबत जाऊन सत्तेत सहभागी झाले तरी त्यांनी काकांबरोबरचे संबंध तोडले नव्हते. कुटुंबात एकमेकांच्या विरोधात निवडणुका लढवल्या तरी त्यांनी सुप्रियांबरोबर भावा बहिणीचे नाते कायम राखले होते.

गेल्या काही महिन्यात शरद पवारांच्या पक्षातील नेत्यांबरोबर चौदा बैठका झाल्या. दादांबरोबर आपल्या दहा बैठका झाल्याचे जयंत पाटील स्वतः सांगत आहेत. या बैठकांचे फोटो किंवा व्हिडिओही व्हायरल झाले आहेत. विलिनीकरणाच्या प्रक्रियेत अजितदादांना पक्षातील अन्य कोणाची लुडबूड नको होती. विलिनीकरणाच्या चर्चेला फाटे फुटू नयेत ह्याची काळजी घेतली होती.

जिल्हा परिषद निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर बारा फेब्रुवारी रोजी विलिनीकरणाची घोषणा करण्याचे ठरले होते. पण अजितदादांच्या मृत्युनंतर हे सर्व खोटे ठरविण्याचा उद्योग अजितदादांच्या पक्षांतील नेत्यांनी सुरू केला आहे. सुनेत्रा पवार यांना विधिमंडळ पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री करण्यासाठी ज्या मंडळींचा पुढाकार होता, तेच विलिनीकरणाच्या विरोधात सूर लावत आहेत.

अजित पवारांनी अडिच वर्षापूर्वी शरद पवारांना सोडून भाजपासोबत सरकारमधे जाण्याचा का निर्णय घेतला आणि आता ते पुन्हा दोन्ही पक्षांचे विलिनीकरण व्हावे यासाठी का आग्रही होते? भाजपामधे जाऊन त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले नाही. दोन्ही पक्ष एकत्र झाले तर संख्याबळ वाढेल व सौदेबाजीची ताकद वाढेल हे त्यामागचे गणित असावे.

अजित पवार यांनी यांचे सर्वेसर्वा शरद पवार होते,हे त्यांनी कधिच लपवून ठेवले नाही. तुझ्या बापापेक्षा माझा काका लई मोठा आहे, हा त्यांनी दिलेला इशारा खूप गाजला होता. काकांच्या समक्ष विलिनीकरण व्हावे हीच त्यांची इच्छा होती. पण विमान अपघातातील त्यांच्या अकस्मिक मृत्युने हे मिशन अपुरे राहिले.

प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, छगन भुजबळ व धनंजय मुंडे हे चार नेते सध्या प्रसिध्दीच्या झोतात आहेत. सुनेत्रा पवार यांना विधिमडळ पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री करण्यात त्यांनी राबवलेली कूटनिती यशस्वी ठरली. अजितदादांच्या अंत्यस्काराच्या वेळी सुप्रिया सुळे खूप सक्रिय होत्या. बारामती, पुणे, मुंबई किंवा दिल्लीतील प्रत्येक नेता त्यांना चांगला ठाऊक आहे. त्या सर्वांची व्यवस्था बघताना दिसल्या.

व्हीआयपींना खुर्ची देण्यापासून ते सुमित्राताईंचा हात धरून धीर देताना त्या दिसत होत्या. अजितदादांचा मृत्युचे राजकारण करू नका, असे आवाहन शरद पवारांनी त्याच वेळी केले. दादांच्या मृत्युनंतर मोठी पोकळी निर्माण झाली.

आता पवार कुटुंबिय म्हणून शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार, आणि जयंत पाटील हेच उद्या सर्वांचा ताबा घेतील, विलिनीकरणाच्या नावाखाली ते पक्षावर नियंत्रण ठेवतील अशी भिती चौकडीला वाटली.

अजितदादांची चिता जळत असतानाच नरहरी झिरवळ यांनी, सुनेत्राताईंनी आता पक्षाचे नेतृत्व करावे असे म्हटले होते. हीच पक्षाची भूमिका होती हे नंतर स्पष्ट झाले.

मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून, भाजपाला विश्वासात घेऊन आणि सुनेत्राताईंचा होकार मिळवून उपमुख्यमंत्रीपदाचा शपथविधी अस्थिविसर्जनाच्या दुस?याच दिवशी मुंबईत पार पडला. आता सुनेत्राताईंच्या संमतीशिवाय पक्षात कोणताही महत्वाचा राजकीय निर्णय होणार नाही.

पटेल, तटकरे, भुजबळ, मुंडे हे हिरो की व्हिलन अशी माध्यमांवरही चर्चा ऐकायला मिळाली. हे नेते चौकशीच्या ससेमिऱ्यामुळेच भाजपासोबत आले आहेत. यातले कोणी अजितदादांना मनापासून साथ देत नव्हते. कोणी छातीत दुखते म्हणन घरीच बसले होते. कोणी भाजपाचे हस्तक असल्यासारखे काम करीत होते. कोणी मंत्रीपदासाठी अगतिक झाले होते.

स्वतः सुनेत्रा पवार या राज्य सहकारी बँकेच्या पंचवीस हजार कोटीच्या घोटाळा प्रकरणात इडीच्या चौकशीत आहेत. साहेबांना (शरद पवार ) काहीही न सांगता सुनेत्राताई या शपथविधीसाठी रातोरात बारामतीहून मुंबईला निघून गेल्या यातूनच पुढील राजकारणाची दिशा आखली गेली.

शरद पवारांनी त्यांच्या पतीला बोट धरून राजकारणात आणले. त्यांचे बंधु पदमसिंह पाटील हे तर शरद पवारांचे निष्ठावान म्हणून ओळखले जातात. मग दादांच्या मृत्यूनंतर कुटुंबातील वडिलधारे म्हणून शरद पवारांना भेटून मुंबईकडे निघता आले नसते का? सोनिया गांधींना जसा विरोध केला, तसा सुनेत्राताईंना शरद पवार विरोध करतील, असे भाजपाशी सलगी ठेवणाऱ्या नेत्यांना वाटले का?

सुनेत्राताईंच्या शपथविधीनंतर, सगळं जैसे थे आहे, फक्त नेता बदलला आहेङ्क विरोधकांना संधी मिळू नये व नेतृत्वात पोकळी राहु नये म्हणून घाई करणे गरजचे होते असे सांगण्यात येत आहे. पण भाजपाच्या संमतीशिवाय एवढा मोठा निर्णय घेणे शक्य होते का ?

मला सांगितल्याशिवाय विलिनीकरणाचा एवढा मोठा निर्णय अजित पवार कसा घेतील? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच विचारला आहे. कोणताही मोठा निर्णय घेताना मला सांगितला पाहिजे हाच संदेश देवाभाऊंनी नव्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताईंना दिला आहे.

अजितदादा हयात असताना विलिनीकरण प्रक्रियेचा केंद्रबिंदू ते स्वतः होते. त्यांच्या मृत्युनंतर या प्रक्रियेला ब्रेक लागलाय, त्याचे श्रेय पटेल, तटकरे, भुजबळ व मुंडे या चौकडीला दिले जात आहे.

विलनिकरण ही अजितदादांची इच्छा होती असे शरद पवारांच्या पक्षातील नेते बोलत आहेत. पण त्यासंदर्भात अजितदादांच्या पक्षातील कोणी ब्र काढत नाहीत. जयललिता यांच्या मृत्युनंतर अण्णा द्रमुक पक्षात भाजपाने लक्ष घातले होते, राम विलास पासवान यांच्या मृत्युनंतर लोकजनशक्ति पक्षाला भाजपानेच दिशा ठरवून दिली होती.

एकनाथ शिंदे यांच्या पक्षावर भाजपाचे नियंत्रण आहे अशी उघड टीका होत असते. आता अजितदादा यांच्या पक्षाचा रिमोट भाजपाकडे असणार आहे. अजितदादांच्या उपस्थितीत विलिनीकरणासाठी डझनभर बैठका झाल्या, हे मोदी, शहा किंवा फडणवीस यांना ठाऊक नव्हते का ?

# सहानुभूतीचे राजकारण आणि घराणेशाहीचा सुळसुळाट

लोकशाही ही व्यक्तीपेक्षा संस्था, कुटुंबापेक्षा विचार आणि वारशापेक्षा पात्रता यांवर उभी असते, असे आपण गृहीत धरतो. मात्र भारतीय राजकारणातील वास्तव वारंवार या गृहितकाला छेद देणारे ठरत आहे. एखाद्या लोकप्रतिनिधीचे निधन झाले की त्याच्या कुटुंबातील सदस्याला तातडीने राजकीय वारस म्हणून पुढे आणण्याची परंपरा आता अपवाद राहिलेली नाही; ती नियमच बनू पाहते आहे.

इंदिरा गांधींपासून राजीव गांधी, राजीव गांधींपासून सोनिया गांधी, राजशेखर रेड्डींपासून जगन मोहन रेड्डी, माधवराव शिंदेंनंतर ज्योतिरादित्य शिंदे, राजेश पायलटनंतर सचिन पायलट, गोपीनाथ मुंडेंनंतर डॉ. प्रीतम मुंडे, विलासराव देशमुखांनंतर त्यांचे पुत्र, आर. आर. पाटील, पतंगराव कदम, सुभाष कुल, प्रमोद महाजन, राजीव सातव अशा अनेक उदाहरणांतून एकच सूत्र ठळकपणे समोर येते... सत्तेचा वारसा हा कार्यकर्तृत्वावर नव्हे, तर रक्तसंबंधावर ठरवला जातो.


बादल डकरे
चांदुर बाजार, अमरावती.
९९७५८४४६३८

या प्रक्रियेला जनतेची सहानुभूती असे गोंडस नाव दिले जाते. मात्र ही सहानुभूती नेमकी कोणासाठी? दिवंगत नेत्याच्या कायार्सांठी की त्याच्या कुटुंबासाठी? लोकशाहीत श्रद्धांजली ही स्मरणातून, मूल्यांतून आणि धोरणांतून व्यक्त होते; मतपेटीतून थेट वारस नेमून नव्हे. तरीही राजकीय पक्ष मृत्यूच्या क्षणालाच संधी मानून तिकीट कुटुंबातच देतात. अनेकदा विरोधी पक्षही या अलिखित समझोत्याचा भाग बनतात.

खरा प्रश्न असा आहे की त्या नेत्याचा राजकीय वारस हा त्याचा मुलगा किंवा मुलगीच का असावा? त्याचा ज्येष्ठ सहकारी, चळवळीतून घडलेला कार्यकर्ता, संघटनेसाठी आयुष्य खर्ची घातलेला नेता हा वारस का ठरत नाही?

पक्षांतर्गत लोकशाहीचा दावा करणारे पक्ष यावेळी मात्र मौन बाळगतात. कारण घराणेशाही सोयीची असते...नाव ओळखीचे, भावनिक वातावरण अनुकूल आणि मतांचे गणित तुलनेने सोपे.

आपण संस्थाने खालसा केली ती राजेशाही संपवण्यासाठी. मग आज लोकशाहीत वारसा नेमण्याची ही मानसिकता नेमकी कुठून आली? अनुभव, कर्तृत्व आणि जनसंपर्काशिवाय केवळ आडनावाच्या जोरावर सत्तेची खुर्ची मिळत असेल, तर ही लोकशाही राहते की आधुनिक राजेशाहीचा नवा अवतार ठरते?

दिवंगत नेत्याचा सन्मान करणे आवश्यकच आहे. पण त्या सन्मानाच्या नावाखाली कुटुंबाला राजकीय मालकी हक्क देणे ही लोकशाहीच्या मूळ सूत्रांशी विसंगत बाब आहे. सहानुभूतीच्या आड घराणेशाही जोपासणारी ही प्रवृत्ती थांबवली नाही, तर लोकांचे राज्य हे केवळ घोषवाक्य उरेल. प्रत्यक्षात मात्र सत्ता काही मोजक्या घराण्यांच्या हातातच फिरत राहील.

लोकशाहीला वाचवायचे असेल, तर प्रश्न विचारावेच लागतील... सत्ता वारसाने मिळावी की पात्रतेने? आणि हा प्रश्न विचारण्याची जबाबदारी केवळ मतदारांची नव्हे, तर स्वतःला लोकशाहीवादी म्हणवणाऱ्या राजकीय पक्षांचीही आहे.

# झपाटलेपण असावं तर असं....

मराठवाड्याच्या व लातूरच्या सार्वजनिक क्षेत्रात धडपडणाऱ्या ज्या मोजक्या युवक कार्यकर्त्यांचा आवर्जुन उल्लेख करता येईल त्यात माधव बावगे यांचे नाव अग्रभागी असल्याचे दिसून येते. विद्यार्थी दशेपासूनच ज्याला विधायक कार्याचे बाळकडू मिळाले आहे. आपल्या रसरसत्या तारुण्याचा अधिकाधिक वेळ आव्हानात्मक स्वरूपाच्या कार्यात गेला पाहिजे, अशी जिद्द बाळगणारे बोटावर मोजता येतील एवढेच युवक कार्यकर्ते असतात. माधव बावगे यांच्या कामाची उत्तुंग झेप पाहिली म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख पटते. १९९१ मध्ये भारत सरकारतर्फे बावगे यांना 'राष्ट्रीय युवा पुरस्कार' मिळाल्याची तार आल्यानंतर लातूरच्या व मराठवाड्यातील समग्र युवक वर्गातून 'सार्थ निवड' झाल्याची प्रतिक्रिया उमटली. मराठवाड्यातील कानाकोपऱ्यातून पत्र व तारेद्वारे माधव बावगे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. माधव बावगे यांचा हा सन्मान व्यक्तिगत नसून मराठवाड्यातील समग्र युवक वर्गाचा सन्मान ठरला.



**डॉ. सोमनाथ रोडे**
**लातूर**
**७५१७९८५६९०**

**भाग १**

**प्रतिकुलतेवर मात :**

अठरा विश्वे दारिद्रय असलेल्या एका गरीब शेतमजुराच्या घरात श्री. माधव बावगे यांचा जन्म १६ सप्टेंबर १९५५ रोजी अटोळा, ता. अहमदपूर येथे झाला. आई-वडील दोघे शेतात मजुरी करून कसेतरी पोट भरायचे. त्यामुळे पोराबाळांकडे व त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होणे स्वाभाविकच.

दुष्काळी काळात मजुरी मिळणे दुर्लभ झाले म्हणून आई-वडिलांना मुंबई गाठावी लागली. मोलमजुरी करून जीवन जगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अटोळा गावातील ग्रामस्थांनी माधवची सर्वतोपरी काळजी घेतली. त्याच्या शिक्षणाची आबाळ होऊ दिली नाही.

शेवटी माधव कसाबसा एकदा मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजनेत वसतिगृहातील सर्व कामे करून माधवने शिक्षणाची भूक भागवली. प्राचार्य डॉ. जे. एम. वाघमारे, उपप्राचार्य आर. एल. कावळे, उपप्राचार्य ए. एस. जाधव, प्रा. मधुकर मुंडे या सर्वांनी माधव बावगेच्या रूपाने उमलू लागलेले 'तरुणाईचे फूल' कोमेजणार नाही याची दक्षता घेतली.

अथक काम करीत राहणे हा माधव बावगेचा स्थायीभाव! या तरुणाला कामाचा कधीच कंटाळा असल्याचे मी पाहिले नाही. म्हणून विद्यार्थी अवस्थेपासून एक गुणी व कष्टाळू विद्यार्थी म्हणून माधव सर्वांचा आवडता विद्यार्थी राहिला. मराठवाड्यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जे सृजनशील विद्यार्थी तयार झाले, त्यात माधव बावगे यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

कोणतेही काम निरपेक्षवृत्तीने करण्याचा माधव बावगे यांचा उपजत स्वभाव आहे. राष्ट्रीय छात्र सेनेत सहभागी होऊनही बावगे यांनी बी सर्टिफिकेट संपादन केले आहे, राष्ट्रीय सेवा योजनेतही सर्वोत्कृष्ट विद्यार्थी होण्याचे भाग्य त्यांनी मिळविले. सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करीत राजर्षी शाहू महाविद्यालयातून बावगे यांनी बी.कॉम.ची परीक्षा उत्तीर्ण केली.

एवढा गुणी विद्यार्थी घरच्या परिस्थितीमुळे पुढे शिकू शकत नव्हता. घरातील वडील मुलगा म्हणून संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी माधववर होती. म्हणूनच संस्थाचालकांनी या गुणी मुलाची कदर केली. त्यास ज्युनिअर क्लर्क म्हणून नियुक्ती दिली. पुढे त्यांनी महाविद्यालयाचे कॅशियर आणि कार्यालय अधीक्षक म्हणूनही काम पाहिले.

**सामाजिक बांधिलकी मानणारे 'युवा मन' :**

नोकरी करू लागल्यानंतर केवळ भौतिक सुखात अडकून पडण्याचा माधव बावगे यांना कधीच मोह झाला नाही. आपल्यासारख्या प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांच्या जीवनात जमेल त्या पद्धतीने सहकार्य करण्याचे असिधारा व्रत त्यांनी घेतल्याचे दिसून येते. एकीकडे म्हाताऱ्या आई-वडिलांची सेवा, छोट्या बहिणीचा विवाह, धाकट्या भावाचे शिक्षण या जबाबदाऱ्या पार पाडीत, दुसरीकडे हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनातील काळोख दूर करण्यास ज्या ज्या मार्गाने मदत करता येईल ती करण्यात माधव बावगे सदैव आघाडीवर राहायचे.

दारिद्र्याची जबर झळ बसलेली असल्यामुळे कसलेही व्यसन नाही, कोणताही अनाठायी छंद नाही. १९७६ पासून आतापर्यंत ७० पेक्षा अधिक वेळेस रक्तदान करून या तरुणाने देशबांधवांसंबंधीची बांधिलकीची भावना व्यक्त केली आहे.

दररोज सकाळी शटल बॅडमिंटनचा सराव हा बावगे यांच्या दैनंदिनीचा अनेक वर्षांपासून चाललेला कार्यक्रम होता. त्यामुळेच चांगली शारीरिक संपदा जतन करण्यात त्यांना बहुधा यश मिळाले असावे. शटल बॅडमिंटनमध्ये त्यांनी बरीच पारितोषिके मिळविली आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनेत कार्य करीत असताना एक गाव एक पाणवठा, सर्वांना मंदिर प्रवेश, अस्पृश्यता निर्मूलन, विषमता निर्मूलन परिषद, व्यसनमुक्ती कार्य, ग्रामीण विकास, साक्षरता प्रसार कार्य, आरोग्य शिबिरे इत्यादीद्वारे आपल्या कार्याची व विचारांची दिशा निवडली. पुरोगामी विचारांचा वसा या कार्यातूनच प्राप्त झाला. जाती धर्मनिरपेक्ष विचारांची शिदोरी बावगेच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यास परिणामकारक ठरली.

महाराष्ट्रातील नामवंत सामाजिक प्रकल्पाशी बावगे यांनी आपले संबंध दृढमूल केले. बाबा आमटेंद्वारा आयोजित 'श्रम संस्कार शिबिरात सहभागी होऊन 'श्रम ही हैं श्रीराम हमारा' ही प्रेरणा घेतली. बाबा आढावांच्या संपर्कातून हमाल पंचायतीची चळवळ लातूरमध्ये लोकप्रिय केली, डॉ. रजनीकांत आरोळे यांच्या ग्रामीण आरोग्य प्रकल्पातून 'जयपूर फूट' शिबिराची स्फूर्ती घेतली.

अण्णा हजारेंच्या राळेगणसिद्धी प्रकल्पातून ग्रामीण विकासाची दृष्टी मिळविली. एस. एन. सुब्बाराव यांच्या राष्ट्रीय युवा प्रकल्पाद्वारे मराठवाड्यात एकात्मता शिबिरे घेण्याचा संकल्प बावगे यांनी केला.

कार्यालयीन व्याप सांभाळून माधव बावगे सतत कुठल्या तरी सामाजिक बांधिलकीच्या कामात स्वतःला झोकून देण्यात समाधान मानतात. माझ्या माहितीप्रमाणे प्रत्येक सुटी, सरेंडर रजा कुठल्या तरी शिबिराला जाण्यासाठीच त्यांनी उपयोगात आणल्याचे दिसून येते.

**साहसाची उत्कट ओढ :**

नित्यनूतन साहसाबरोबर स्पर्धा करणारा तरुणच खरा तरुण असतो. माधव बावगे यांनी आपल्या सत्तर वर्षाच्या कालावधीत अत्यंत साहसी जीवन जगल्याचे दिसून येते. केवळ विसाव्या वर्षी बाबा आमटेंच्या आदिवासी भागातील भामरागड प्रकल्पाला जाण्यासाठी तब्बल शंभर किलोमीटरचा प्रवास सौ. साधनाताई आमटेंसोबत केल्याचे मला स्मरते.

**(क्रमशः)**

■ ■ ■

# युवकांमध्ये आत्मशक्तीचा साक्षात्कार ते गावखेड्यांची स्वयंपूर्णता

श्रमसंस्कार शिबिरांतून देशाचा दीपस्तंभ असलेल्या युवकाच्या मनाची मशागत करून त्याच्यातील आत्मशक्तीची धग पेटविणारा आणि या माध्यमातून गावखेड्यांची स्वयंपूर्णता या जाणिवेतून आणि नेणीवेतून ज्यांची वयाच्या ८४ व्या वर्षीही अखंड वाटचाल सुरू आहे असा झंझावात म्हणजे डॉ. प्रा. सोमनाथ रोडे. वर्तनातून परिवर्तन घडविण्याची ताकद असणाऱ्या युवकाचा आवाज बुलंद करणा?या डॉ. सोमनाथ रोडे यांचा प्रवास थक्क करणारा आणि तेवढाच दिशादर्शक आहे.

कर्मयोगी डॉ. बाबा आमटे यांच्या मौलिक विचारांचा सदैव पगडा असणारे प्रा. डॉ. सोमनाथ रोडे हे बालपणीच मातृ सुखाला मुकले पण ममत्व काय असते हे त्यांच्या सामाजिक कार्यातून दिसून येतं. ते म्हणतात आईच्या खांद्यावर असलेल्या मुलाचे ओझे हे आईसाठी ओझे नसून उदात्त, हवेहवेसे, निखळ अशी जाणीव आहे आणि समाज म्हणजे आईच्या खांद्यावरील एक मुल आहे.

याच भावनेने समाजसेवेचे व्रत घेणारे डॉ. सोमनाथ रोडे यांचा जन्म शंकरअप्पा रोडे व प्रयागबाई रोडे यांच्या पोटी शेतकरी कुटुंबात झाला. आई लहानपणीच वारल्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या आजोळी परळी वैजनाथ येथे झाले. प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर पीपल्स कॉलेज नांदेडला बीएपर्यंतची शिक्षण झाले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एमए पर्यंतचे शिक्षण घेतले.

अहमदपूर तालुका येथील एका महाविद्यालयात इतिहासाचे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर १९७० ला महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर येथे प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, उपप्राचार्य व प्राचार्य म्हणून ३७ वर्षांची सेवा दिली. येथे त्यांनी लाईफ अँड वर्क ऑफ बाबा आमटे या विषयावर पीएचडी केली. बाबा आमटे यांच्यावर पीएचडी करणारे ते पहिले आहेत असे ते अभिमानाने सांगतात.

प्राध्यापक म्हणून काम करीत असताना एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मशक्तीचा साक्षात्कार करीत त्यांच्यातील श्रमशक्तीचा वापर करीत गावखेडी स्वयंपूर्ण करण्यामध्ये त्यांनी आपले आयुष्य वेचले. या कार्याची बीजे त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातच पेरल्या गेली.






mahasagarngp@gmail.com

नांदेडला शिकत असताना नरहर कुरुंदकर, गाडगीळ, के. आर. शिरवाडकर असे प्रख्यात प्राध्यापक त्यांना शिकवायला होते. त्यांच्या विचारसरणीच्या मुशीत त्यांचे व्यक्तिमत्व वृद्धिंगत होत गेले आणि त्याच काळात नरहर कुरुंदकर यांच्या माध्यमातून डॉ. बाबा आमटे यांच्या श्रमसंस्कार शिबिराचा अनुभव घेता आला.

त्यांचे विचार, जीवनाकडे बघण्याची समग्र दृष्टी, त्यातून आलेले समाजसेवेचे भान, युवा संस्कार या सर्व गोष्टी जवळून बघता आल्या आणि त्यांच्या विचारांचा पगडा त्यांच्या जीवनावर सदैव राहिला.

ते मोठ्या अभिमानाने सांगतात की १९६८ पासून २०२४ पर्यंत झालेल्या श्रमसंस्कार शिबिराचा मी साक्षीदार आहे. हीच श्रमसंस्कार शिबिरे त्यांनी महाविद्यालयांमध्ये एनएसएसच्या माध्यमातून सुरू ठेवली. त्यांनी केलेल्या या योगदानातून औरंगाबाद येथे विद्यार्थी कल्याण संचालक व राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक या पदावर ते सहा वर्ष होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून त्यांनी युवकांची अनेक शिबिर घेतली. गावामध्ये साधी आणि सुलभ शौचालये बांधली. नांदेड येथील नेरली या कुष्ठरोग प्रकल्पाची त्यांनी निव बांधली. तेथील विविध विद्यालयातील युवकांना एकसंघ करीत त्यांचे सतत तीन महिने येथे शिबिर लावले आणि या प्रकल्पासाठी आवश्यक पाया बांधणी केली.

ते गौरवाने सांगतात सतत तीन महिने शिबिर लावणे हा त्या काळचा पहिला उपक्रम होता. विद्यार्थ्यांमध्ये साहित्य विषयक रुची वाढावी म्हणून त्यांनी दहा दिवसीय ग्रामीण आत्मकथन शिबिर, यदुनाथ थत्ते, एस.एन. सुब्बाराव यांच्या मार्गदर्शनाखाली रचनात्मक आणि श्रमाचे महत्त्व विशद करणारे शिबिरे घेतले.

या सोबतच लोकनायक जयप्रकाश नारायण आणि विनोबा भावे यांच्या सर्वोदय चळवळीच्या माध्यमातून ५६ दिवसांची पदयात्रा काढली. या पदयात्रेमध्ये पाणी संवर्धन, माती संवर्धन, शोषखड्डे, अशा विविध समस्यांना त्यांनी हात घातला.

स्वयंपूर्ण खेडी हा देशाचा श्वास असतो. खेड्यांच्या विकासाची धुरा सांभाळणारे ग्रामसभा आणि ग्रामपंचायत महत्त्वाचा भाग असून त्याच्या शक्तीकरणावर त्यांनी जोर देत आपल्या व्याख्यानातून आणि सभांतून सशक्त गावाचे विचार मांडले. हे करीत असताना गावांमध्ये सहिष्णुता विकसित केली.अनिस च्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याचेही ते प्रयत्न करतात.

श्रमसंस्कार शिबिरातून युवकांचे आत्मभान जागृत करीत असतानाच प्राध्यापक ते प्राचार्य या प्रवासामध्ये त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडविलेच नाही तर कित्येक विद्यार्थी आज प्राचार्य या पदाला साजेसे असे जीवन जगत आहेत.

प्राध्यापक सोमनाथ रोडे यांनी लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज अशा अनेक विभूतींच्या व्यक्तिमत्त्वावर हजारोंच्या वर व्याख्याने दिली आहेत. विविध ऐतिहासिक पुस्तकांचे त्यांनी लेखन व प्रकाशन केले आहे. इतिहासावरील अभ्यासक्रमाची विविध पुस्तके ही त्यांनी लिहिलेली आहे.

वयाच्या ८४ व्या वर्षीही सेवानिवृत्तीनंतरही त्यांच्या समाजकार्याचा आणि झपाटून काम करण्याचा वेग अचंबित करणारा आहे. विविध पदावर आरुढ असणारे आणि विविध पुरस्कारांचे मानकरी ठरलेले रोडे आपल्या अनुभव विश्वातून सांगतात की गावाचा विकास हा कोणत्याही पुढाऱ्यावर अवलंबून न राहता ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेऊन करावा.

ग्रामसभा आणि ग्राम पंचायत यांना कार्यान्वित करण्यासाठी गावकऱ्यांचा अंकुश असणे आवश्यक आहे. ते युवकांना मार्गदर्शन करतात की तुमच्या जीवनाचे शिल्पकार तुम्हीच आहात तेव्हा स्वतःला ओळखा आणि कार्यप्रवण व्हा.

यावेळी वृत्तपत्राच्या माध्यमातून ते सांगू इच्छितात की माध्यमे ही समाजाचे प्रतिबिंब आहे. येथे ज्याही चांगल्या विकासात्मक गोष्टी घडतात त्याला माध्यमांमध्ये जागा मिळणे आवश्यक आहे जेणेकरून समाजावर त्याचा प्रभाव पडेल.

आपल्या दमदार कार्यशैलीतून आणि नेतृत्वातून त्यांनी केवळ समाज उभारणीच केली नाही तर माणुसकीचे नाते निभाविले आहे.युवकांमध्ये आत्मशक्तीचा जागर आणि त्यातून गाव समृद्धी हा त्यांचा प्रवास अखंड यशाच्या मार्गावर राहो यासाठी अनेक शुभेच्छा.

---------------

**सोमनाथ रोडे संपर्क क्रमांक**
**9421483611**

■ ■ ■



# कॉफी आणि झटपट वेट लॉस

आजकाल लोक सतत हेल्दी ड्रिंक्सवर प्रयोग करत असतात. चहामध्ये आले घालणे सामान्य आहे, परंतु आता बरेच लोक कॉफीमध्ये आले देखील पिण्यास सुरवात केली आहे. काही लोक चयापचय वाढविण्यासाठी आणि रोग प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी ते पितात, तर काहीजण त्यास वजन कमी करणारे पेय मानतात. कॉफी आणि आले दोन्ही आरोग्यासाठी फायद्याचे मानले जातात. कॉफीमध्ये असलेले कॅफिन मन सतर्क ठेवण्यास, थकवा कमी करण्यास आणि लक्ष केंद्रित करण्यास मदत करते.

आल्यामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे पचन सुधारण्यास, सर्दी-खोकला दूर करण्यास आणि रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत करतात. जेव्हा हे दोघे एकत्र मिसळले जातात तेव्हा हे पेय शरीरात उबदारपणा निर्माण करते आणि चयापचय सक्रिय करण्यास मदत करते. काही लोकांसाठी, हे संयोजन पोटातील गॅस, सूज येणे आणि मळमळ यासारख्या समस्यांपासून आराम देते. वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांमध्ये जिंजर कॉफी खूप लोकप्रिय होत आहे.

आले शरीराच्या चरबी-बर्निंग प्रक्रियेस गती देण्यास मदत करू शकते, तर कॉफी काही काळ भूक नियंत्रित करते. सकाळी रिकाम्या पोटी थोड्या प्रमाणात आल्यासह कॉफी पिण्यामुळे उर्जेची पातळी वाढू शकते आणि दिवसभर आपल्याला सक्रिय वाटू शकते.

हे पेय शरीरातील जळजळ कमी करण्यास आणि स्नायूंचा कडकपणा कमी करण्यास देखील उपयुक्त आहे, विशेषतः जे व्यायाम करतात त्यांच्यासाठी. ज्या लोकांना ही समस्या आहे त्यांनी अशी कॉफी पिण्यास विसरू नये, तथापि, कॉफीमध्ये आले पिणे प्रत्येकासाठी फायदेशीर नाही.

ज्या लोकांना आंबटपणा, छातीत जळजळ किंवा पोटात अल्सरची समस्या आहे त्यांच्यासाठी हे संयोजन ही समस्या वाढवू शकते. कॉफी आणि आले या दोहोंचा शरीरात गरम प्रभाव असतो, ज्यामुळे जास्त प्रमाणात सेवन केल्यास पोटात जळजळ, अस्वस्थता आणि वेगवान हृदयाचा ठोका येऊ शकतो. याव्यतिरिक्त, जास्त प्रमाणात कॅफिन घेतल्यास झोपेची समस्या आणि चिंता देखील वाढू शकते.

दिवसातून एक कपपेक्षा जास्त आल्याची कॉफी पिऊ नका. आल्याचे प्रमाण देखील मर्यादित करा, जास्त प्रमाणात आले जोडल्यास चव खराब होऊ शकते आणि आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. रिकाम्या पोटी पिण्यापूर्वी आपली पाचक क्षमता समजून घेणे महत्वाचे आहे. जिंजर कॉफी म्हणजे कॉफीमध्ये आल्याचा उपयोग करून तयार केलेले पेय असून ते वजन कमी करण्यासाठी उपयुक्त मानले जाते.

आल्यामध्ये नैसर्गिक थर्मोजेनिक गुणधर्म असतात, जे शरीरातील चयापचय (मेटाबॉलिझम) वाढवण्यास मदत करतात. मेटाबॉलिझम वेगवान झाल्याने शरीरातील साठलेली चरबी जाळण्याची प्रक्रिया जलद होते. कॉफीतील कॅफिनही फॅट बर्निंग प्रक्रियेला चालना देते, त्यामुळे जिंजर कॉफी वजन कमी करण्यासाठी प्रभावी ठरू शकते.

जिंजर कॉफी भूक नियंत्रित ठेवण्यास मदत करते. आल्यामुळे पचन सुधारते, गॅस व पोटफुगी कमी होते आणि पोट हलके वाटते. कॉफी प्यायल्याने ऊर्जा वाढते आणि व्यायाम करण्याची क्षमता सुधारते.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## आयुष्याचं सार्थक ..!

किती वर्ष जगलोचा आहे
लेखाजोखा आपणाकडे
पण शेष किती राहिले
हे गुपितच आहे गडे..!

वार्निंग नोटीस देता देता
विधाताही थकतो
उर्वरीत जीवनाचं कल्याण
करून घे म्हणतो ..

जन्ममरणाच्या फेऱ्यातून
मनुष्य योनीतच
मिळे सुटका
मरावे परि कीर्ती रूपे उरावे
सत्कार्यांची हीच
आहे घटका ...

# भारतातील वाढत्या दीर्घकालीन श्वसन विकारांचे व्यवस्थापन करण्यासाठी त्याचे लवकर आणि अचूक निदान होणे महत्त्वाचे: वैद्यकीय तज्ञांचे मत

**नागपूर, ४ फेब्रुवारी :** आरोग्यसेवेतील नवोपक्रमांची ९० वर्षे साजरी करत असतानाच, फुफ्फुसांच्या आरोग्याच्या निदानासाठी भारतातील पहिली समर्पित निदान सुविधा असणारे सिप्लाचे ब्रीदफ्री लंग वेलनेस सेंटर देशभरात लवकर आणि सुलभ श्वसन काळजी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक अग्रगण्य पाऊल आहे.

सद्यस्थितीला भारत वाढत्या सार्वजनिक आरोग्य आव्हानाचा सामना करत आहे, यामध्ये दीर्घकालीन श्वसनविकार (सीआरडीएस) हे देशातील असंसर्गजन्य रोगांच्या (एनसीडीएस) वाढत्या प्रमाणासाठी जबाबदार असलेल्या प्रमुख दोन कारणांपैकी एक आहे. १ चिंताजनक बाब म्हणजे, श्वसनविकारामुळे (सीआरडीएस) होणाऱ्या जागतिक मृत्यू आणि अपंगत्व-समायोजित आयुर्मान पैकी ३०% पेक्षा जास्त वाटा या देशाचा आहे. २ या धक्कादायक आकडेवारीनंतरही, भारत अजूनही निदान न झालेल्या एका मूक साथीच्या रोगाशी झुंज देत आहे, ज्यामध्ये तीव्र दम्याची लक्षणे असलेल्या सुमारे ७०% लोकांचे निदान होत नाही आणि अंदाजे ९५९८% सीओपीडी प्रकरणांचेही निदान होत नाही. उत्तम प्रणाली. ३, ४ अधिक सक्षम पाठिंबा आणि निदानविषयक तज्ञांपर्यंत सुलभ पोहोच याद्वारे लवकर निदान सक्षम करणे, हाच पुढील मार्ग आहे.

डॉ राजेश स्वर्णकर, पल्मोनोलॉजिस्ट, नागपूर म्हणाले, श्वसनविकार हा व्यक्तींच्या जीवनावर आणि आरोग्यसेवेवर प्रचंड ताण निर्माण करत असल्याने, त्याचे लवकर निदान, तपासणी होणे आणि उपचारांना प्राधान्य देणाऱ्या सर्वसमावेशक उपायांची तातडीची गरज आहे. ब्रीदफ्री लंग वेलनेस सेंटरसारखी वन-स्टॉप केंद्रे रुग्णांपर्यंत फुफ्फुसांच्या आरोग्याच्या सर्वसमावेशक निदान आणि काळजी सेवा पोहोचवून ही दरी भरून काढण्यास मदत करतात. शहरे वाढत असताना आणि जीवनशैली बदलत असताना, दमा आणि सीओपीडी सारखे दीर्घकालीन आजार हळूहळू केंद्रस्थानी येत आहेत. भारताचा आरोग्य नकाशा बदलत आहे, अल्पकालीन संसर्गांपासून ते दीर्घकालीन आजारांकडे तो पसरत आहे.

डॉक्टर पुढे सांगितले, असंतुलित आहार, कमी शारीरिक हालचाल आणि वाढते प्रदूषण यामुळे भारताच्या आरोग्याच्या स्थितीमध्ये नकळतपणे बदल घडतआहेत आणि आपले फुफ्फुस त्याची किंमत चुकवत आहेत. जागरूकतेचा अभाव, सामाजिक भीतीमुळे आणि योग्य तपासणीची उपलब्धता मर्यादित असल्यामुळे दमा आणि सीओपीडी सारखे आजार अनेकदा वर्षानुवर्षे लक्षात येत नाहीत. याशिवाय, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची आणि स्पायरोमेट्रीसारख्या विश्वसनीय साधनांची कमतरता असल्यामुळे वेळेवर निदान करणे अधिक कठीण होऊन बसते, त्यामुळे अनेक रुग्णांचे निदान होत नाही आणि त्यांच्यावर अपुरा उपचार होतो.

# अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेडने आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या ९ महिन्यांचे निकाल जाहीर केले

**अहमदाबाद, ४ फेब्रुवारी :** अदाणी समूहाची प्रमुख कंपनी असलेल्या अदाणी एंटरप्राइजेस लिमिटेड (एईएल) ने आज ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे निकाल आज जाहीर केले.

या तिमाहीत, एईएलने अधिग्रहणाच्या पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीत ग्रीनफिल्ड नवी-मुंबईविमानतळावर कामकाज सुरू करून, सातत्याने उत्कृष्ट कार्यक्षमता आणि प्रकल्प अंमलबजावणीतील उत्कृष्ट कामगिरी करण्याचा आपला विक्रम अधिक मजबूत केला आहे. एईएल ने दोन एचएएम रस्ते प्रकल्प पूर्ण करून आणि गुवाहाटी विमानतळावरील एकात्मिक नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटन करून, ठरलेल्या वेळेत यशस्वीपणे कामे पूर्ण केली आहेत.

मजबूत अंमलबजावणी आणि स्पष्ट धोरणात्मक दृष्टिकोनामुळे, अदाणी एंटरप्राइझने आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या नऊ महिन्यांत दमदार परिचालन कामगिरी केली आहे, जी आमच्या इनक्यूबेटर मॉडेलची ताकद आणि वैविध्यपूर्ण पायाभूत सुविधांच्या पोर्टफोलिओची खोली दर्शवते, असे अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी म्हणाले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कामकाजाची सुरुवात ही एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे, जी राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर आणि वेगाने उभारण्याच्या आमच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. विमानतळ, नवीकरणीय ऊर्जा उत्पादन, डेटा सेंटर्स आणि वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये आमची सातत्यपूर्ण प्रगती, तसेच आमच्या यशस्वी राइट्स इश्यू आणि एनसीडी ऑफरिंगद्वारे मिळालेल्या मजबूत भांडवली बाजाराच्या पाठिंब्यामुळे, आम्ही विकासाच्या पुढील टप्प्याला गती देण्यासाठी सुसज्ज आहोत. भारत ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, एईएल आर्थिक मूल्य निर्मितीबरोबरच शाश्वतता, तांत्रिक नेतृत्व आणि दीर्घकालीन राष्ट्रीय परिणामांशी जोडणाऱ्या जागतिक स्तरावर स्पर्धात्मक व्यवसायांना विकसित करण्याच्या आपल्या ध्येयावर ठाम आहे.

# आरआर काबेलतर्फे काबेल स्टार सीझन ४ चे विजेते जाहीर

**नागपूर, ४ फेब्रुवारी :** भारतातील आघाडीची ग्राहक विद्युत उपकरणे तसेच वायर आणि केबल उत्पादक कंपनी आरआर काबेल यांनी नागपूर येथे काबेल स्टार शिष्यवृत्ती कार्यक्रम २०२५ च्या विजेत्यांची अभिमानास्पद घोषणा केली. उद्योगक्षेत्रातील एक अग्रगण्य उपक्रम असलेला हा शिष्यवृत्ती कार्यक्रम इलेक्ट्रीशियन्सच्या यावर्षी १० वीची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केलेल्या मुलांसाठी विशेषतः तयार करण्यात आला आहे. शिक्षित आणि सक्षम भारत या आरआर काबेलच्या दृष्टीकोनाशी सुसंगत राहून या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी १ कोटी रु. हून अधिक निधी देऊन या होतकरू विद्यार्थ्यांच्या उच्च माध्यमिक शिक्षणाला प्रोत्साहन व पाठबळ दिले जाते. आतापर्यंत देशभरात जवळपास ४००० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून प्रत्येकाला १०,००० रु. इतकी वैयक्तिक शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणासाठी केवळ आर्थिक आधार मिळाला आहे एवढेच नाही तर आपल्या स्वप्नांची पूर्तता करण्याच्या दिशेने त्यांनी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.



काबेल स्टार शिष्यवृत्ती कार्यक्रमाच्या चौथ्या पर्वात अर्जदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. देशभरातील जवळपास १,००० विजेत्यांपैकी नागपूर शहराने विशेष ठसा उमटवला असून येथे ४७ सन्मानार्थींचा समावेश आहे. या सर्वांचा नागपूर येथील विदर्भ हिंदी साहित्य संमेलन येथे आयोजित विशेष समारंभात सत्कार करण्यात आला.

हा शिष्यवृत्ती कार्यक्रम म्हणजे आरआर ग्लोबलच्या संचालिका श्रीमती किर्ती काबरा यांच्या दृष्टीकोन आणि नेतृत्वाचे यश आहे. त्याबाबत आपले विचार व्यक्त करताना त्या म्हणाल्या, आरआर काबेलमध्ये आमचे काबेल दोस्त नेहमीच व्यवसायातील भागीदारांपेक्षा अधिक राहिले आहेत. ते आमच्या संपूर्ण प्रवासाचा पाया आहेत. काबेल स्टार शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आम्ही केवळ आर्थिक मदत देत नाही, तर पिढ्यान्‌पिढ्या आयुष्य बदलू शकतील अशा संधींचे दरवाजे उघडत आहोत. मोठी स्वप्ने पाहणाऱ्या प्रत्येक मुलाला ती पूर्ण करण्याची संधी मिळायला हवी आणि कोणतेही स्वप्न परिस्थितीमुळे मर्यादित राहू नये याची खात्री करण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. हे तरुण यशस्वी विद्यार्थी आत्मविश्वासाने आपल्या भविष्यातील वाटचाल करताना पाहणे हेच या उपक्रमाचे खरे फळ आहे.

काबेल स्टार्स शिष्यवृत्ती कार्यक्रम हा समाजाची परतफेड करण्याच्या आणि पुढील पिढीसाठी अधिक उज्ज्वल व सुशिक्षित भविष्य घडवण्याच्या दृष्टीने आरआर काबेलचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून उभा आहे. हे विद्यार्थी त्यांच्या शैक्षणिक प्रवासात पुढे जात असताना इलेक्ट्रिशियन आणि त्यांच्या कुटुंबांच्या आकांक्षांना पाठबळ देणे आणि त्यांचा सन्मान करणे तसेच पुढील पिढीचे भविष्य घडवण्यात हातभार लावणे यासाठी आरआर काबेल कटिबद्ध आहे.

# डीएसपी म्युच्युअल फंडातर्फे डीएसपी नेत्र आधारित डीएसपी मल्टी ॲसेट ओम्नी फंड ऑफ फंड्सचा शुभारंभ

**मुंबई, ४ फेब्रुवारी :** डीएसपी म्युच्युअल फंडाने गुंतवणूकदारांसाठी आज डीएसपी मल्टी ॲसेट ओम्नी फंड ऑफ फंड्स हा नवीन फंड आणला आहे. ही नवीन योजना मुदतमुक्त श्रेणीतील फंड ऑफ फंड प्रकारची योजना आहे. शेअरबाजारातील घडामोडींचा सतत मागोवा घेणे, कोणत्या प्रकारात कधी आणि किती निधी गुंतवायचा अथवा शेअरबाजाराच्या वेगवेगळ्या चढउतारांदरम्यान विविध पर्यायातील गुंतवणूकीच्या व्यवस्थापनाबाबत स्वतःहून निर्णय घेणे शक्य नसणाऱ्या व्यक्तींसाठी गुंतवणूक सुलभ करणे, हा या फंडाचा उद्देश आहे. नवीन फंडाची ऑफर (एनएफओ) ५ फेब्रुवारी २०२६ रोजी गुंतवणूकीसाठी खुली होणार असून येत्या १९ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होणार आहे. डीएसपी म्युच्यूअल फंडने स्वतः विकसित केलेली बाजाराची माहिती देणारी प्रणाली (मार्केट इंटेलिजन्स फ्रेमवर्क) डीएसपी नेत्रव्दारे हा फंड संचलित केला जाणार आहे. डीएसपी नेत्र प्रामुख्याने बाजारातील आकडेवारी, मूल्यांकन आणि दीर्घकालीन ऐतिहासिक कल आदी घटकांचा विश्लेषणासाठी वापर करते. याद्वारे विविध गुंतवणूक प्रकारांमधील जोखीम आणि नफ्याची शक्यता (मार्जिन ऑफ सेफ्टी) यांचा अंदाज घेतला जातो आणि त्यामुळे शेअरबाजाराच्या बदलत्या परिस्थितीनुसार गुंतवणुकीचे निर्णय घेण्यास मदत होते.

बाजाराचे नेतृत्व करणाऱ्या क्षेत्रांमध्ये वारंवार होणारे बदल, व्याजदरांचे चक्र आणि जागतिक अनिश्चिततेच्या सध्याच्या वातावरणात, हा फंड गुंतवणूकदारांना गुंतवणूकीसाठी सुनियोजित मार्ग उपलब्ध करून देतो. यामुळे गुंतवणूकदार भविष्यातील कोणत्याही अंदाजावर विसंबून न राहता किंवा शेअरबाजारातील घडामोडींमुळे विचलित होऊन घाईघाईने निर्णय न घेता आपली गुंतवणूक विविध प्रकारात विभागून गुंतवणूकीत स्थिरता राखू शकतो.

फंडाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात विविध म्युच्युअल फंड कंपन्याचे फंड (एएमसी) आणि ईटीएफ यामध्ये गुंतवणूक करण्याची लवचिकता आहे. यामुळे बदलणाऱ्या काळानुरूप त्याचबरोबर बाजारातील बदलत्या संधीनुरूप या फंडाचा पोर्टफोलिओ स्वतःला जुळवून घेऊ शकतो. यासाठी हा फंड उद्योगातील सर्वोत्कृष्ट इक्विटी फंड व्यवस्थापकांच्या समभाग निवडीच्या कौशल्याचा आणि विविध प्रकारांत निधी गुंतवणूकीसाठी डीएसपी नेत्रने विकसित केलेल्या धोरणांचा एकत्रित वापर करतो. गुंतवणुकीच्या विविध प्रकारांमधील पुनर्संतुलन हे फंडाच्या अंतर्गतच केले जाते. परिणामी गुंतवणूकदाराने स्वतः वारंवार खरेदी-विक्रीचे निर्णय घेतल्यास कराचा त्याच्यावर पडणारा बोजा या फंडातील गुंतवणूकीमुळे कमी करण्यास मदत होते.

हा फंड साधारणपणे २५ टक्के ते ७५ टक्के निधी समभाग योजनांमध्ये, १५ टक्के ते ५० टक्के कर्जरोख्यांमध्ये आणि १० टक्के ते ५० टक्के सोने आणि चांदीच्या ईटीएफमध्ये गुंतवणूक करेल. बाजाराच्या तत्कालीन परिस्थितीनुसार या गुंतवणुकीचे प्रमाण कमी-जास्त केले जाईल. या गुंतवणूक पद्धतीचा उद्देश अर्थव्यवस्थेच्या आणि शेअरबाजाराच्या विविध चक्रांमध्ये अधिक सक्षम आणि लवचिक पोर्टफोलिओ तयार करणे हा आहे.

# अपोलो टायर्सने भारताच्या क्रिकेटींग आत्म्याला सामर्थ्यशाली अभिवादन देणाऱ्या नव्या जाहिरात मोहिमेद्वारे आपली भूमिका अधिक बळकट केली आहे

**नागपूर, ४ फेब्रुवारी :** भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रायोजक असलेल्या अपोलो टायर्सने आज आपल्या नव्या ब्रँड मोहिमेचे, हर सफर में दम है (प्रत्येक सफरमध्ये दम आहे) चे उद्घाटन केले. या मोहिमेत क्रिकेटचा महानायक सचिन तेंडुलकर यांच्यासह टीम इंडियाचे खेळाडू विराट कोहली, रोहित शर्मा, के.एल. राहुल, शुभमन गिल आणि अर्शदीप सिंग अधिकृत टीम इंडिया जर्सीमध्ये दिसणार आहेत. ही मोहीम एका भावनिक ब्रँड फिल्मवर आधारित आहे जी भारतीय क्रिकेटच्या अविचल आत्म्याचा गौरव करते आणि अपोलोच्या टायर्स तत्त्वज्ञानाशी त्याचे साम्य दाखवते.



या फिल्ममध्ये दाखवले आहे की कसे हे खेळाडू धाडसी स्वप्ने पाहणाऱ्या मुलांपासून भारताची जर्सी परिधान करणाऱ्या खेळाडूंमध्ये रूपांतरित झाले, जे अब्जावधी भारतीयांच्या आशा जागतिक मंचावर घेऊन जातात केवळ प्रतिभेच्या जोरावर नव्हे, तर सर्वोत्तम होण्यासाठी आयुष्यभराच्या बांधिलकीमुळे.

या कथानकात समांतरपणे उपस्थित आहे दिग्गज क्रिकेटपटू आणि अपोलो टायर्सचे ब्रँड ॲम्बेसेडर सचिन तेंडुलकर. पिढ्यान्‌पिढ्या क्रिकेटपटूंना आणि कोट्यवधी भारतीयांना प्रेरणा देणारे सचिन, भारतीय क्रिकेटची परंपरा, मूल्ये आणि मानदंडांचे प्रतीक म्हणून या फिल्ममध्ये दिसतात.

ही मोहिम अपोलो टायर्सच्या मूलभूत श्रद्धेचे प्रतिबिंब आहे की उत्कृष्टता ही चिकाटी, शिस्त आणि सातत्य यांद्वारे घडवली जाते, असे अपोलो टायर्स लिमिटेडचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक नीरज कांवर म्हणाले. प्रत्येक सफर मधे दम आहे ही भारतीय आत्म्याला आमचा सलाम आहे आणि सर्वोत्तम होण्यासाठी लागणाऱ्या अविचल बांधिलकीला आमचे अभिवादन आहे.

सर्जनशील दृष्टिकोन मांडताना, सिमरन कांवर ज्यांनी पटकथा आणि स्क्रीनप्ले लिहिले तसेच जाहिरात चित्रपटाची संकल्पना केली, म्हणाल्या, हर सफर में दम है ही केवळ प्रवासाची सुरुवात नाही, तर उत्कृष्टतेच्या अखंड शोधाबद्दल आहे. हे कदाचित एकमेव जाहिरात चित्रपट असेल ज्यात एका खेळातील जगातील सर्वोत्तम खेळाडूंना एकत्र आणले आहे, मा तुझे सलाम या आपल्या क्रिकेट गाण्यावर आधारित. या सर्व घटकांनी मिळून हा चित्रपट खरोखरच आयकॉनिक बनतो, जागतिक स्तरावर महानतेची व्याख्या करणारा आत्मा, अभिमान आणि मानदंड यांचे दर्शन घडवतो.

बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी या फिल्मबद्दल सांगितले, ही फिल्म भारतीय क्रिकेटचा आत्मा प्रामाणिकपणे पकडते. देशाचे सर्वोच्च स्तरावर प्रतिनिधित्व करण्यासाठी लागणारे परिश्रम, त्याग आणि चिकाटी यांचे प्रतिबिंब यात दिसते. बीसीसीआयला अपोलो टायर्ससोबत भागीदारी करण्याचा अभिमान आहे एक असा ब्रँड जो प्रतिभेला पोषण देण्याचे आणि गवताच्या मुळांपासून जागतिक दर्जाच्या प्रावीण्यापर्यंतच्या प्रवासाचा उत्सव साजरा करण्याचे महत्त्व समजतो.

अपोलो टायर्स लिमिटेडचे ग्रुप हेड मार्केटिंग, उदयन घई यांनी सांगितले, ही मोहीम अपोलो टायर्सच्या ब्रँड तत्त्वज्ञानाचे प्रभावी प्रतिपादन आहे, जी कामगिरी, चिकाटी आणि विश्वासार्हतेभोवतीची आमची भूमिका अधिक दृढ करते. भारतीय क्रिकेटच्या भारत ते जग या प्रवासाशी तुलना करत ही फिल्म अपोलो टायर्सच्या जागतिक ब्रँड म्हणून झालेल्या उत्क्रांतीचे प्रतिबिंब आहे आणि ग्राहकांशी भावनिक नाते अधिक मजबूत करते.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत विवाहित मुलीसाठी माहेर हे कायमचे घर असल्याचा संदेश

**मुंबई, ४ फेब्रुवारी :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका आपल्या प्रेरणादायी कथानक आणि आपल्याशी नाते सांगणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. मालिकेतील प्रमुख पात्र पुष्पा (करुणा पांडे) हिच्या दैनंदिन संघर्ष आणि विजयांचे सुंदर चित्रण या मालिकेला सर्वाधिक लोकप्रिय कौटुंबिक मनोरंजनांपैकी एक बनवते. अलीकडील एका प्रसंगात पुष्पा आणि तिची मुलगी राशी (अक्षया हिंदळकर) यांच्यातील नात्याचे दर्शन घडते, ज्यातून हे अधोरेखित होते की आयुष्य कितीही अस्थिर झाले तरी आईचे घर हे मुलीसाठी सर्वात सुरक्षित आश्रयस्थान असते. मालिकेत दाखवलेला हा हृदयस्पर्शी क्षण आईच्या निःस्वार्थ ऊब, संरक्षण आणि दिलासा यांचे दर्शन घडवतो. पुष्पा त्या समजुतीला आव्हान देते जी अजूनही अनेक भारतीय घरांमध्ये अस्तित्वात आहे की मुलगी लग्न झाल्यावर तिचा माहेरी परतण्याचा किंवा तिथे आधार शोधण्याचा हक्क कमी होतो. या विचारसरणीला थेट आव्हान देत पुष्पा ठामपणे सांगते की ती अशा पालकांपैकी नाही जी मुलगी लग्नानंतर तिला विसरतात. पुष्पासाठी राशी ही तिची मुलगीच राहते, वैवाहिक स्थिती काहीही असो. आई म्हणून तिची जबाबदारी लग्नानंतर संपत नाही, तर ती नव्या रूपात पुढे जाते. ती सतत राशीच्या सुख-समाधानाची,तिच्या वातावरणाची आणि तिला मिळणाऱ्या प्रेम, सन्मान व आदराची काळजी करत राहते. पुष्पा स्पष्ट करते की राशी ज्या घराचा भाग बनते, ते घर तिला स्वतःच्या मुलीसारखेच स्वीकारले पाहिजे आणि तिला नेहमी मिळालेल्या काळजी व समजुतीची अनुभूती दिली पाहिजे.

या अनुभवाबद्दल बोलताना करुणा पांडे म्हणाल्या, मुलीला पराया धन म्हणण्याची संकल्पना मला नेहमीच खोलवर त्रास देत आली आहे. माझा विश्वास आहे की मुलगी ही पालकांच्या घरातील खरी समृद्धी, सामर्थ्य आणि आनंदाचा स्रोत आहे, तरीही तिला परकी असल्यासारखे वाटवले जाते. एक भारतीय स्त्री म्हणून मला नेहमीच हा आवाज उठवायचा होता आणि पुष्पाच्या माध्यमातून मला अखेर ती संधी मिळाली. लेखक, दिग्दर्शक आणि संपूर्ण टीमने मला असा प्रगतिशील आणि समाजात बदल घडवण्याची क्षमता असलेला रोल दिल्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.

# सोनी सबवरील गणेश कार्तिकेय मालिकेत गिरीजात्मज कथा साकारली जाते



**मुंबई, ४ फेब्रुवारी :** सोनी सबवरील पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही मालिका भगवान गणेश (निरण्य समाधिया) यांच्या दिव्य प्रवासाचे चित्रण करते, जिथे ते सिंधुरासुराने निर्माण केलेल्या दोषांना सामोरे जातात. अष्टविनायकातील चिंतामणी अध्याय संपत असताना मत्सराचा नवा दोष उगम पावतो. पवित्र गुहेत भगवान गणेशांचा सामना मत्सरासुराशी (अनवर खान) होतो, जो ईर्षा आणि द्वेषाने प्रेरित आहे.

भगवान गणेश पवित्र चिंतामणी परत मिळवून त्याचा गैरवापर थांबवतात आणि न्याय व शहाणपणाचा धडा शिकवतात. हा अध्याय संपताच कथा अधिक भावनिक प्रवासाकडे वळते. देवी पार्वती (श्रेनू परिख) आपल्या प्रेम आणि तपश्चर्येच्या माध्यमातून त्या पवित्र गुहेची आठवण काढतात, जिथे त्यांनी भगवान गणेशाला पुत्र म्हणून मिळवण्याची इच्छा व्यक्त केली होती, आणि त्या गणेशाला पुन्हा तिथे जाण्यास सांगतात. गणेशाला न कळता ती गुहा आता मत्सरासुराच्या ताब्यात आहे, जो गणेशाची उपस्थिती स्वीकारू शकत नाही आणि त्यांचा विनाश करू इच्छितो. मत्सरासुर आपली सेना गावात पाठवतो गणेशाला शोधण्यासाठी, पण प्रत्येक नाव गणेशाशी जोडलेले असल्याने ते संतप्त आणि गोंधळलेले होतात.

भगवान गणेशाची भूमिका साकारणारे निरण्य समाधिया म्हणाले, या कथानकाने मला शिकवले की मत्सर माणसाला चुकीची कामे करायला प्रवृत्त करतो. मला गिरीजात्मज दृश्यांचे शूटिंग खूप आवडले कारण ते दाखवतात की आईचे प्रेम किती शक्तिशाली असते. यामुळे मला जाणवले की प्रेम आणि श्रद्धा कोणत्याही शत्रूपेक्षा अधिक सामर्थ्यवान आहेत.

# ऋषी सक्सेना यांनी सोनी सबच्या इत्ती सी खुशी मधील थप्पड सीन शूट करताना झालेल्या घबराटीची आठवण सांगितली



**मुंबई, ४ फेब्रुवारी :** सोनी सबचा इत्ती सी खुशी अन्विता (सुम्बुल तौकीर खान) हिच्या भावनिक प्रवासाचे चित्रण करतोएक निस्वार्थी तरुणी जी आपल्या भावंडांसाठी पालकाची भूमिका निभावते. जीवनातील कठीण प्रसंगांत कुटुंबाला आधार देण्यापासून ते प्रेम आणि विवाहाच्या आव्हानांना सामोरे जाण्यापर्यंत, अन्विताने नेहमीच आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कथानक जसजसे पुढे सरकते, तसतसे प्रेक्षक अन्विता आणि तिचा पती संजय (ऋषी सक्सेना) यांच्यातील क्षण पाहत आहेत, जे केवळ नाट्यमयच नाहीत तर अत्यंत भावनिकही आहेत.

ऋषी सक्सेना यांनी त्या दृश्याचे चित्रीकरण करताना झालेला अनुभव सांगितला, मी यापूर्वीही अनेक तीव्र दृश्ये केली आहेत, पण यावेळी परिस्थिती वेगळी होती आणि मला थोडी घबराट होत होती कारण मला एका स्त्रीला थप्पड मारायची होती. मी हा प्रसंग सुम्बुलसोबत चर्चा केला, आणि आम्ही दोघेही समर्पित कलाकार असल्यामुळे हा प्रसंग पूर्ण निष्ठा आणि प्रामाणिकपणे साकारण्याचा निर्णय घेतला. हे दृश्य अत्यंत तीव्र होते, पण सुम्बुलसोबत काम करणे आनंददायी ठरले कारण तिने त्या तीव्रतेची गरज ओळखली आणि संपूर्ण शूटदरम्यान मला साथ दिली.



## गुरूवार दि. ५ फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| ३ ६ ९ ० | ३ ४ ७ ८ |
| १५७ १७८ २३४ २३५ | २२९ ११२ १२४ ५६७ |
| २३८ ३५८ ४५० ४७९ | ३३७ २२० २७८ ४४० |
| ४९० २४० १४४ ३८९ | १६६ ३३८ ८९० ३७८ |
| जोडी | जोडी |
| ३५ - ६५ - ९१ - ०१ | ३५ - ४५ - ७१ - ८१ |
| ३७ - ६७ - ९२ - ०२ | ३९ - ४९ - ७० - ८० |
| ३८ - ६८ - ९४ - ०४ | ३३ - ४४ - ७७ - ८८ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ५ फेब्रुवारी २०२६

## गुरूवार दि. ५ फेब्रुवारी २०२६

| सर्व बाजार साठी | |
|---|---|
| | १० - ४० - ५९ - ८२ |
| | १३ - ४३ - ५७ - ८९ |
| | १६ - ४६ - ५२ - ८७ |
| | १३७ - ७८९ - २४९ - १७० |
| | ३८० - ३४७ - ४५६ - ३६९ |
| | ६७८ - १६७ - १७७ - ५६७ |

सर्व बाजारासाठी

गुरू. ते शनि. ओपन डे — गुरू. ते शनि. ओपन नाईट

१५७ १५८ ५००  १३५ २३५ १५५
४४५ **३** ३४७ **४** ६९० **५**  ३६० **९** ४६० **०** ५८८ **१**
३५५ ७८९ ७८०  ५६८ ११८ ३९९

गुरू. ते शनि. क्लोज डे — गुरू. ते शनि. क्लोज नाईट

२२७ २२८ १३४  ४६७ ७९० २४९
६६९ **१** ३३६ **२** ३५० **८**  ८९० **७** ११४ **६** ४५६ **५**
५७९ ४९९ ५६७  २५० २४० ३४८

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

१ २ ३ ९ ०

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही इतरांच्या गरजा आणि भावनांबद्दल संवेदनशील असाल. तुमच्या सल्ल्याचा इतरांना फायदा होईल. आज तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळू शकतात. कामात तुमची आवड वाढेल.

**वृषभ :** आजचा दिवस लकी ठरेल. आज तुमच्यावर काही कौटुंबिक जबाबदाजया सोपवल्या जातील, ज्या तुम्ही पूर्ण कराल. तुम्ही जे काही केले आहे त्यामुळे सर्वजण खूप आनंदी असतील.

**मिथुन :** नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाजयांसाठी आज बाजार विश्लेषण करणे चांगले राहील. आज तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन जबाबदारी मिळेल, जी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडू शकाल.

**कर्क :** आज धार्मिक कार्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. एखाद्या विषयावर इतरांशी बोलणे किंवा सल्लामसलत करणे फायदेशीर ठरेल. तुम्ही महत्त्वाच्या बाबी आणि नातेसंबंधांवर विचार कराल.

**सिंह :** आज तुमचा व्यवसाय चांगला चालेल. तुमचे वैयक्तिक आयुष्य चांगले राहील. जर तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल तर अनुभवी व्यक्तीचा सल्ला नक्कीच घ्या, तुम्हाला चांगले मत मिळेल.

**कन्या :** वडिलांचा पाठिंबा तुमच्यासोबत असेल. लेखकांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे, त्यांच्या लेखनाचे कौतुक केले जाईल. ऑफीसमध्ये काम करणाजयांना महत्वाची जबाबदारी मिळेल.

**तुळ :** भावा-बहिणींसोबतुमचा दुरावा मिटेल. आणि तुम्ही भावंडांसोबत घरी चित्रपट पाहण्याचा प्लान आखाल. आज घरी धार्मिक कार्यक्रम होऊ शकतो, ज्यामुळे शुभ वातावरण निर्माण होईल.

**वृश्चिक :** आज तुम्ही महत्वाचं काम हाताळण्यात खूप यशस्वी व्हाल. तुम्हाला प्रत्येक बाबतीत सकारात्मक राहावे लागेल. आज काही जुन्या समस्यांवर मित्रांसोबत चर्चा होईल, त्यातून तुम्हाला चांगला उपाय मिळेल.


**धनु :** तुम्ही आज सरकारी कामात धोरणे आणि नियमांकडे पूर्ण लक्ष दिले तर तुम्हाला काम करणे सोपे जाईल. आज तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत घाई करणे टाळावे लागेल.

**मकर :** आज कौटुंबिक कामात तुमच्या पैशाची आवश्यकता भासेल. महत्त्वाच्या कामाबद्दल आणि नात्याबद्दल विचार आणि योजना कराल. कुटुंबाशी संबंधित समस्या संपण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** तुम्हाला आर्थिक लाभ आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. लहान मुले आज खूप आनंदी असतील आणि नवीन गोष्टींचा शोध घेतील. तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील. आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील.

**मीन :** तुमची आर्थिक बाजू मजबूत असेल. तुम्ही सणानुरूप तुमचे घर सजवाल. तुम्ही तुमच्या बोलण्यावर संयम ठेवावा. एखाद्या गोष्टीबद्दल जास्त हट्टी राहण्याचे टाळावे. पुन्हा प्रयत्न केल्यास तुम्ही यशस्वी होऊ शकता.

## शब्दकोडे क्रमांक २३४४



**आडवे शब्द :-**

१) जलाभास
४) कलावंत
७) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
१०) संताप
१२) जेवणातील दोन पदार्थ
१४) वरदक्षिणा
१५) चांगले लक्षण असलेला
१७) थंड
१८) गव्हाचे पीठ
१९) अमान्य, नामंजूर
२०) भेग, चीर
२१) कुराणातील वचने
२२) चंद्र
२३) आगबोट
२६) सोने, सुवर्ण
२९) जंगली फुलांची माळ
३२) गडीमाणसे
३४) शरीराची थरथर
३६) लाटण्याचा जोडीदार
३८) फळाचे टरफल
३९) कैफी, नशा आणणारा
४१) खटका, वेदना
४२) कावळा
४३) मुख
४५) हाताचा तळवा
४७) अवस्था, स्थिती
४८) गवंडी
५०) तात्पर्य
५१) मुलांच्या भाषेत देव
५२) थोडेफार
५४) ईश्वरी शक्ती, पार्वती
५६) शंकराचे वाहन असलेल्या बैलाचे नाव
५७) रात्री प्रकाशणारा किटक
५८) मुलगी
५९) गुणांची चाहा करणारा
६१) काळ्या रंगाची
६२) निवासस्थान
६३) भारवाहक
६४) अथवा, किंवा
६५) विविध, अनेक

**उभे शब्द :-**

२) लोकांचा घेराव
३) विश्व, दुनिया
५) पेरणी, तमाशातील शृंगारिक गीत
६) मोटार (इं)
७) तोफवाहक शस्त्र
८) रजनी
९) जीवनमान, राहणीचा दर्जा
११) एक झाडावर दुसरे रोप रुजविण्याची क्रिया
१३) बोजा, वजन
१४) थोडीशी दलाली घेऊन मालाची ने-आण करणारा दलाल
१५) आलेली चांगली संधी
१६) रक्त, रुधिर
१८) आवाजांचा गोंधळ
१९) वायु
२०) दालचिनीचे झाड
२४) चलनवलन
२५) झकास, मस्त
२७) अलमारी
२८) मांडी, आंकडा
२९) लग्न समारंभातील नवरदेवाची आई
३०) पोशिंदा, धनी
३१) सर, हार
३२) कागदी चलन
३३) रसपूर्ण
३५) छोटासा
३६) उदर
३७) भेग बुजविणारी वा भेग वाढविणारी खुंटी
४०) विजयादशमी आणि दीपावली
४१) कलमापासून तयार झालेले (फळ)
४२) समईतील कापसाची वळी
४४) पाताळात भोगाव्या लागणा-या वेदना
४५) कपाटातील खण
४६) नशीब,दैव (हिं.)
४७) फिरता पहारा
४९) हिशेबातील खर्चाच्या विरुद्धची बाजू
५१) फुंकून वाजविण्याचे एक वाद्य
५३) जामीनकी
५४) सध्या
५५) वेदना
५६) इंद्राची बाग, पुत्र
५९) सोवळ्याचे रेशमी वस्त्र
६०) गुलामी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# अंबानगरीच्या सिमेवर वाघाची दहशत?

## पोहरा-चिरोड़ी जंगलात वाघाची ठाम उपस्थिती | कॅमेरा ट्रॅपमध्ये छायाचित्रे कैद, वन विभाग सतर्क

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.4 )**- अमरावती जिल्ह्यातील पोहराङ्कचिरोड़ी वनपरिक्षेत्रातून वन्यजीवप्रेमी आणि वन विभागासाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. गेल्या काही काळापासून चर्चेत असलेल्या पट्टेदार वाघाची या वन परिसरात नियमित उपस्थिती स्पष्ट झाली असून, ऑल इंडिया टायगर एस्टिमेशन सर्व्हे 2025ङ्क26 दरम्यान वाघाचे ताजे व ठळक पगमार्क आढळले आहेत. यामुळे पोहराङ्कमालखेड परिसरात वाघ वावरत असल्याची अधिकृत पुष्टी झाली आहे.



हा सर्वे केवळ वाघांची संख्या मोजण्यासाठीच नव्हे, तर त्यांच्या अधिवासाचे संवर्धन आणि भविष्यातील संरक्षण धोरणे ठरविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. तज्ज्ञांच्या मते, वाघाची उपस्थिती म्हणजे संपूर्ण परिसंस्था सुदृढ असल्याचा सकारात्मक संकेत आहे. वन विभागाच्या माहितीनुसार, मागील काही महिन्यांपासून पोहराङ्कचिरोड़ी वनपरिक्षेत्र आणि आसपासच्या भागात वाघाच्या हालचाली सातत्याने नोंदविल्या जात होत्या.एकाच भागात वारंवार पगमार्क, झाडांवर ओरखड्यांच्या खुणा तसेच शिकार अवशेष आढळल्याने वाघाने या परिसरातच आपला ठाव मांडल्याचे स्पष्ट झाले आहे. नियमित गस्तीदरम्यान जलस्रोत आणि पायवाटांजवळ सापडलेल्या पगमार्कचा आकार व अंतर हे प्रौढ वाघाकडे निर्देश करतात. विशेष म्हणजे, वाघाची छायाचित्रे कॅमेरा ट्रॅपमध्येही कैद झाली आहेत.

### गावकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन*

वन विभागाने जंगलालगतच्या गावांना सतर्कतेचा इशारा देत अनावश्यक जंगलप्रवेश टाळण्याचे, तसेच रात्रीच्या वेळी जनावरे मोकळी न सोडण्याचे आवाहन केले आहे. वाघासंदर्भातील कोणतीही माहिती तातडीने वन विभागाला कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.दरम्यान, अमरावती जिल्ह्यातील मेलघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत असल्याचे चित्र आहे. आंतरराष्ट्रीय वाघ दिनानिमित्त जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार 105 वाघांची अधिकृत नोंद होती, तर ताज्या माहितीनुसार ही संख्या 110 च्या पुढे जाण्याचा अंदाज आहे. अंतिम सर्वे अहवाल लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

### दीर्घकालीन निगराणी आवश्यक

यूथ फॉर नेचर कंझर्वेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. स्वप्निल सोनवणे यांनी सांगितले की, मागील सर्वेक्षणातही पोहराङ्कमालखेड जंगलात वाघाचे पगमार्क आणि कॅमेरा ट्रॅपमधील नोंदी आढळल्या होत्या. मात्र वाघ स्थायी आहे की भ्रमणशील, हे ठरविण्यासाठी दीर्घकालीन निरीक्षण आवश्यक असून सध्या वन विभागाकडून नियमित मॉनिटरिंग सुरू आहे.

# नांदगाव खंडेश्वरसाठी स्वतंत्र टाऊन फिडर, ए.बी. स्विचची मागणी

- सततच्या वीजखंडितपणामुळे नागरिक त्रस्त
- कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर





**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.4 )** - नांदगाव खंडेश्वर शहरात वारंवार होणाऱ्या वीजखंडितपणामुळे नागरिक हैराण झाले असून, विद्युत कर्मचाऱ्यांच्या जीवितासही धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर नांदगाव खंडेश्वर शहरासाठी स्वतंत्र टाऊन फिडर तयार करावा तसेच शहरातील प्रत्येक वितरण पेटी (डी.पी.)वर ए.बी. स्विच बसवावेत, अशी ठाम मागणी युवा ग्रामीण पत्रकार संघाने केली आहे.

यासंदर्भात संघाचे अमरावती विभागीय अध्यक्ष उत्तम ब्राम्हणवाडे यांनी नायब तहसीलदार सदानंद देशपांडे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता श्याम येणकुंटीवार व शहर शाखेचे सहाय्यक अभियंता हरीश महल्ले यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. सध्या किरकोळ दुरुस्तीसाठीही संपूर्ण फिडर बंद करावा लागत असल्याने नागरिकांना वारंवार वीजखंडितपणाचा सामना करावा लागत आहे. तसेच लाईन सुरू असताना डी.पी.वर चढून काम करताना कर्मचाऱ्यांना अपघाताचा धोका संभवतो. प्रत्येक डी.पी.वर ए.बी. स्विच बसविल्यास फिडर बंद न करता दुरुस्ती शक्य होऊन वीजपुरवठा सुरळीत राहील आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षितताही सुनिश्चित होईल.

दरम्यान, महावितरणकडून ए.बी. स्विचबाबत पाहणी करून अंदाजपत्रक वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याचे सहाय्यक अभियंता हरीश महल्ले यांनी स्पष्ट केले. स्वतंत्र टाऊन फिडरचा निर्णय उपकेंद्र मंजुरीनंतर शक्य होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# स्व. अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालयाची उज्वल कामगिरी




**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.4 )**- स्व. अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालय, मोर्शी येथील स्काऊटङ्कगाईड पथकाने मुदखेड येथे झालेल्या 42 व्या स्काऊटङ्कगाईड मेळाव्यात उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाची मान उंचावली आहे. या मेळाव्यात एकूण सात विविध स्पर्धा पार पडल्या. त्यामध्ये विद्यालयाने शोभायात्रा स्पर्धेत प्रथम, तर तंबू सजावट स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

या यशात 16 स्काऊट व 14 गाईड विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विद्यार्थ्यांनी शिस्त, संघभावना व कल्पकतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्काऊटर संदीप टिक्कस व गाईडर कु. अर्चना धांडे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे हे यश साध्य झाले. मुख्याध्यापक ए. डी. जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या कामगिरीमुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून पालक व नागरिकांकडून विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# निर्मिती पब्लिक स्कूलमध्ये दोन दिवसाचे स्नेहसंमेलन

## विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक सादरीकरण; पत्रकार व शिक्षकांचा गौरव

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.4 )** - चांदूर बाजार तालुक्यातील निर्मिती पब्लिक स्कूल येथे दोन दिवसांचे स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाट्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.




स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी शाळेचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रवीण तायडे, इंडिया कबड्डी फेडरेशनचे सचिव जितेंद्रसिंह ठाकूर, तहसीलदार मनोज सोनारकर, नगराध्यक्ष मनीषा नागलिया, नगरसेवक सचिन खुळे व मनीष नागलिया, विजयराव टोम्पे, भाजप तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे, मनोज कटारिया, समन्वयक चैतन्य टोम्पे, वैष्णवी टोम्पे, मुख्याध्यापक तुषार खोंड तसेच फार्मसी कॉलेजचे प्राचार्य राहुल जोध उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने करण्यात आली. यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून शाळेतील शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमशीलतेचे प्रभावी दर्शन घडले. या प्रसंगी चांदूरबाजार तालुक्यातील पत्रकारांचा विशेष गौरव करण्यात आला. सुरेश सवळे, मदन भाटे, शरद केदार, सागर सवळे, बादल डकरे व माजिद इकबाल यांचा सन्मान करण्यात आला. तसेच शाळेतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### योजनेच्या लाभार्थ्यांनी ह्यातीची नोंद घ्या!

**अमरावती** - संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांनी 31 मार्चपर्यंत ह्यातीची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दरवर्षी 1 जानेवारी ते 31 मार्च या कालावधीत लाभार्थ्यांनी त्यांचे योजनेबाबतचे मासिक अनुदान ज्या बँक खाते, पोस्ट ऑफीसमध्ये जमा होते, अशा बँक मॅनेजर अथवा पोस्ट ऑफीसमध्ये पोस्ट मास्टर यांचे समक्ष हजर राहून स्वत: ह्यात असल्याची नोंद घ्यावी, अथवा विहीत नमुन्यात ह्यात असल्याची नोंद घेऊन मॅनेजर, पोस्टमास्टर यांच्या सही, शिक्का घ्यावा. सदर विहीत नमुना बँक, पोस्ट ऑफीस किंवा अमरावती तहसिल कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी केले आहे.

# घुईखेड ग्रा.पं.मध्ये प्रजासत्ताक दिन

## प्रतिष्ठित नागरिक व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.4 )** - चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड ग्रामपंचायतीत 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सेवानिवृत्त राज्य राखीव पोलीस दलातील जवान व हौशी खगोलशास्त्र अभ्यासक विजय गिरूळकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

कार्यक्रमात गावातील प्रतिष्ठित नागरिक भानुदास बनकर, लक्ष्मण पवार, दीपक जयस्वाल, विद्याताई उदयकर (माजी पंचायत समिती सभापती) तसेच अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान व यासीन खान यांचा नागरी सत्कार करण्यात आला. उच्च शिक्षणात उल्लेखनीय यश मिळविलेल्या अभिषेक अरविंद चनेकार (आयआयटी मुंबई) व डॉ. अंकित गोविंद नवघरे यांचाही गौरव करण्यात आला. तसेच ग्रामपंचायत कर वेळेवर भरणाऱ्या निलकंठ मानकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आज पत्रकारांसाठी मोफत आरोग्य शिबिर

## आयुष्मान कार्ड काढण्याची सुविधा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 4 )** - पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्यांसाठी अमरावती जिल्हा पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर गुरुवार, दि. 5 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 ते दुपारी 3 या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात होणार आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकार, प्रसारमाध्यम कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी शिबिर पूर्णत: मोफत असणार आहे.



या शिबिरात सहभागी होणाऱ्यांना विविध तपासण्यांची सुविधा एकाच छताखाली मिळणार आहे. आरोग्यविषयक चाचण्यांमध्ये संपूर्ण रक्त तपासणीसाठी लिपीड टेस्ट, फुल बॉडी चेकअप, नेत्र तपासणी आणि दंत चिकित्सा यांचा समावेश आहे. याठिकाणी केवळ तपासणीच नाही, तर तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्याबाबत मार्गदर्शनही केले जाणार आहे. यासोबतच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिबिरात आयुष्मान कार्ड काढण्याची विशेष सोय करण्यात आली आहे. यासाठी पत्रकारांनी आपले रेशन कार्ड, आधार कार्ड आणि आधारशी लिंक असलेला मोबाईल नंबर सोबत आणणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील पत्रकारांनी आपल्या कुटुंबासह याचा लाभ घ्यावा, तसेच अधिक माहितीसाठी 9028655559, 9822496972 किंवा 9881102080 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पालकमंत्री कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# चांदूर रेल्वे येथे आज भूमी अभिलेख विभागाचा जनता दरबार



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 4 )** - चांदूर रेल्वे येथील भूमी अभिलेख कार्यालयात गुरूवार, 5 फेब्रुवारी रोजी अमरावती जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाच्या वतीने जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. या जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांच्या मोजणी, फेरफार, तसेच भूमी अभिलेखाशी संबंधित विविध प्रलंबित कामांचा निपटारा करण्याचा उद्देश आहे. या जनता दरबारात नागरिकांनी आपल्या जमिनीविषयक समस्या व अर्ज थेट सादर करावेत, जेणेकरून संबंधित कामे वेळेत व योग्य पद्धतीने पूर्ण करता येतील. तरी संबंधित नागरिकांनी 5 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता भूमी अभिलेख कार्यालय, चांदूर रेल्वे येथे उपस्थित राहून आपल्या कामासंबंधी निवेदन सादर करावे, असे आवाहन स्थानिक भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक यांनी केले आहे.

# माझ्या वडिलांना अभिप्रेत असलेले शिक्षण या विद्यालयात मिळत आहे!

### क्षितिज अभ्यंकर यांचे प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी**

**गौरखेडा,( दि.4 )**- राहुल व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालित मिलिंद विद्यालय, गौरखेडा (चांदई) येथे वार्षिक स्नेहसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, हळदीकुंकू व बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावर संस्थेचे अध्यक्ष क्षितिज मधुकरराव अभ्यंकर होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, माझे वडील स्व. मधुकरराव अभ्यंकर यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागात सर्व सुविधांनी युक्त मिलिंद विद्यालयाची स्थापना केली. आज परिसरातील नागरिक, पालक व शिक्षकांच्या सहकार्यामुळे येथे गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात असून, हेच माझ्या वडिलांचे स्वप्न होते. या कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका प्रा. शुभांगी अभ्यंकर, मुख्याध्यापक अमित वानखडे, विविध शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल बक्षिसे देण्यात आली. हळदीकुंकू कार्यक्रमानिमित्त महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन अमोल बोबडे व पूजा काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक कावरे यांनी केले.

# मजुरांच्या हक्कांसाठी युवक काँग्रेसचा अर्धदफन आंदोलनाचा इशारा

### राहुल येवले यांचा सरकारला गंभीर इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.4 )**- मेळघाटातील चिखलदरा व धारणी तालुक्यांमध्ये प्रशासकीय अनास्थेमुळे आदिवासी मजुरांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रलंबित मजुरी, थकीत देयके आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे ठप्प झालेली मनरेगाची कामे तातडीने सुरू न झाल्यास अमरावती जिल्हा युवक काँग्रेस आक्रमक आंदोलन छेडणार असल्याचा इशारा जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक पार पडली.



यावेळी बोलताना राहुल येवले म्हणाले की, मेळघाटातील आदिवासी व शेतकरी वर्गाची उपेक्षा आता सहन केली जाणार नाही. प्रशासनाने केवळ आश्वासनांवर वेळकाढूपणा न करता प्रत्यक्ष मजुरांच्या खात्यात मजुरी जमा करावी. अन्यथा युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मनरेगाच्या कामावरील सीसीडीच्या खड्ड्यांमध्ये स्वत:ला 'अर्धदफन' करून तीव्र निषेध नोंदवतील. या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा ठाम इशाराही त्यांनी दिला. बैठकीत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप तातडीने मिटवून विकासकामे सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच '20 ऑनगोइंग कामे' ही जाचक अट रद्द करून नवीन वर्ककोड सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून अकुशल मजुरांची मजुरी थकीत असून होळी सणापूर्वी ती अदा करावी, यावरही भर देण्यात आला. यासोबतच दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली कुशल कामांची देयके तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली. या बैठकीस कार्याध्यक्ष अनिकेत डेंगळे, प्रदेश महासचिव नितेश वानखडे, वैभव वानखडे, उत्कर्ष देशमुख, रितेश पांडव, परीक्षित जगताप, सागर कलाने, ऋग्वेद सरोदे, शैलेश काळबांडे, निलेश डांगे, संदीप शेंडे यांच्यासह जिल्हा व विधानसभा स्तरावरील अनेक पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहिरनामा

**अर्जदार :- श्री. घनश्याम नामदेव बागडे, रा. मालखेड रेल्वे ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती**

**विरूद्ध**

**गैरअर्जदार :- निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी तथा सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, मालखेड रेल्वे**

या द्वारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, निबंधक तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय, मालखेड रेल्वे ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती यांनी अर्जदार श्री. घनश्याम नामदेव बागडे रा. मालखेड रेल्वे ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती यांनी स्वत:चा जन्म मालखेड रेल्वे येथे दिनांक २९/१२/१९५३ रोजी झाल्याची खात्री पटल्याने व अनावधानाने जन्माची नोंद करण्यात आलेली नसल्यामुहे जन्माची नोंद निबंधक तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय, मालखेड रेल्वे येथे करण्यातकरीता आदेश मिळण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झाला आहे.

सदर जन्माची नोंद करून देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणत्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्या त्यांनी जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला आक्षेप लेखी स्वरूपात या कार्यालयामध्ये दाखल करावा. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप, हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहिरनामा आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्धी करण्यात येत आहे.

कोर्ट शिक्का

**तहसीलदार**
**तथा तालुका दंडाधिकारी चांदूर रेल्वे**

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# बेकायदेशीर पूनम चेंबर्सवर कारवाई का नाही?



## उच्च न्यायालयाकडून तीव्र संताप व्यक्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

तीन दशकापासून सिव्हिल लाईन्स परिसरातील पूनम चेंबरच्या बेकायदेशीर बांधकामावर कारवाई करण्यात अपयशी ठरलेल्या अधिकाऱ्यांवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तीव्र संताप व्यक्त केला. न्यायालयाने या काळातील सर्व जबाबदार अधिकाऱ्यांसह महापालिका आयुक्तांना कारणे द्या नोटीस बजावत त्यांच्यावर कारवाई का करण्यात येऊ नये? अशी विचारणा केली. बेकायदेशीर बांधकामावर कठोर भूमिका घेण्याऐवजी मऊ हाताने प्रकरण हाताळले जात असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

या प्रकरणी विजय बाभरे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या. अनिल पानसरे आणि न्या. निवेदिता मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकेनुसार, सिव्हिल लाईन्स परिसरातील ही इमारत विधान भवनासमोरच असून, अनेक वर्षांपासून वादाच्या भोवऱ्यात आहे. याचिकाकर्त्याने २०१६ मध्ये याचिका दाखल करत इमारतीचे बांधकाम बेकायदा असून त्यात अनेक अनियमितता झाल्याचा दावा केला होता.

याप्रकरणी न्यायालयीन आदेशानुसार महापालिकेने पूनम चेंबर्सच्या बेकायदेशीर बांधकामावर कारवाई करण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची तसेच त्या काळातील महापालिका आयुक्तांची नावे न्यायालयात सादर केली.

त्यानंतर न्यायालयाने या सर्व अधिकाऱ्यांना आणि आयुक्तांना याचिकेत पक्षकार करण्याचे निर्देश दिले तसेच कारणे द्या नोटीस बजावली. जबाबदार अधिकाऱ्यांच्याविरोधात कारवाई का करण्यात येऊ नये, असा सवाल करत १७ फेब्रुवारीपर्यंत जबाब नोंदवण्याचे निर्देश दिले.

दरम्यान, महापालिकेने सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या बेकायदा बांधकाम पाडकामा बाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अंतिम आदेश देण्यात आला होता. मात्र, संबंधित आदेशाला एकल न्यायाधीशांकडे आव्हान देण्यात आल्याने त्यावर स्थगिती देण्यात आली असून, त्यामुळे पाडकामाची प्रक्रिया सुरू करता आलेली नाही. याचिकेवर पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा संदर्भ देत बेकायदा व अनधिकृत बांधकामांवर कडक कारवाई होणे आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदवले.

# अॅडव्हांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाचे ६ ला उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (AID) यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या अॅडव्हांटेज विदर्भ २०२६ खासदार औद्योगिक महोत्सवच्या तिसऱ्या आवृत्तीचे उद्घाटन शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसर, अंबाझरीझअमरावती मार्ग, नागपूर येथे होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थान केंद्रीय मंत्री व खासदार औद्योगिक महोत्सवाचे प्रवर्तक नितीन गडकरी भूषवतील, तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, रोजगार मंत्री आकाश फुंडकर, वित्त राज्यमंत्री आशीष जयस्वाल, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, उद्योग व पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक उपस्थित राहतील.

देशभरातील नामवंत उद्योगपतींचीही या महोत्सवात उपस्थिती राहणार आहे. त्यामध्ये लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन, अदानी समूहाचे (एअरपोर्ट्स) संचालक जीत अदानी, महिंद्रा अँड महिंद्राचे कार्यकारी संचालक राजेश जेजुरीकर, पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व

## केंद्रीय मंत्री गडकरी, मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती : तयारी अंतिम टप्प्यात




व्यवस्थापकीय संचालक जीन टोबूल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, मुख्यमंत्री यांचे सल्लागार (गुंतवणूक, उद्योग व तंत्रज्ञान) कौस्तुभ धवसे यांचीही उपस्थिती राहील.

एम्पॉवरिंग ग्रोथ या संकल्पनेवर आधारित हा तीन दिवसीय भव्य औद्योगिक महोत्सव असून, यामध्ये विदर्भातील औद्योगिक सामर्थ्य, नवकल्पना आणि गुंतवणूक क्षमतेचे दर्शन घडवणारे भव्य औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या तयारीने अंतिम टप्पा गाठला असून मुख्य सभागृह, प्रदर्शन हॉल्स व सत्र हॉल्स पूर्णतः सज्ज झाले आहेत. सहभागी व पाहुण्यांना जागतिक दर्जाचा अनुभव देण्यासाठी सध्या तयारीवर अंतिम हात फिरवला जात आहे.

आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषद (इंटरनॅशनल बिझनेस कॉन्क्लेव्ह) हे अॅडव्हांटेज विदर्भ २०२६ चे प्रमुख आकर्षण राहणार आहे. या परिषदेत २३ हून अधिक देशांचे राजदूत व व्यापार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या परिषदेत संरक्षण, अन्नप्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, शिक्षण, स्टार्टअप्स, पेटंट्स व नवकल्पना, लॉजिस्टिक्स, पर्यटन व आदरातिथ्य, सेबी संबंधित विषय, कोळसा, पोलाद तसेच औषधनिर्मिती अशा विविध क्षेत्रांवर तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

एआयडीचे अध्यक्ष आशीष काळे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी अशोक गोयल, गिरधारी मंत्री, प्रशांत उगेमुगे, डॉ. विजय शर्मा, आशिष काळे, प्रा. राजेश बागडी, अविनाश घुशे, महेश साधवानी, अनुप खंडेलवाल, प्रसन्न देशपांडे आणि कर्वे कॉलेजच्या प्राचार्य कृपा सावलानी उपस्थित होते.

### सांस्कृतिक व मनोरंजन कार्यक्रम

या औद्योगिक महोत्सवात सांस्कृतिक व मनोरंजन कार्यक्रमांचीही रंगतदार मेजवानी असणार आहे. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता नागपूरच्या प्रसिद्ध गायिका श्रीनिधी घटाटे यांचा लाईव्ह कॉन्सर्ट होणार आहे. ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता एमकेएसएसएस स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी यांच्या वतीने फॅशन शोचे आयोजन करण्यात येणार असून, प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता सितार सिम्फनी हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे. याशिवाय गेमिंग झोन, नागपूर फूड फेस्टिव्हल, ई-व्ही एक्स्पो तसेच ऑपरेशन सिंदूरमध्ये वापरण्यात आलेल्या ड्रोनद्वारे सादर होणारा भव्य ड्रोन शो ही विशेष आकर्षणे असणार आहेत.

### : विशेष आकर्षणे :

श्रीनिधी घटाटे यांचा लाईव्ह कॉन्सर्ट
सितार सिम्फनी सांस्कृतिक कार्यक्रम
फॅशन शो व ड्रोन शो
गेमिंग झोन, फूड फेस्टिव्हल व ई-व्ही एक्स्पो

### : कार्यक्रमाची तयारी :

एकूण प्रदर्शन क्षेत्रफळ : ३२५० लाख चौ. फूट
सभागृह : १ मुख्य सभागृह, ३ सत्र सभागृह २ प्रदर्शन हॉल
फूड झोन : ३
सर्व सभागृहे वातानुकूलित
व्हीआयपी, प्रदर्शनकर्ते व पाहुण्यांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था

## जंगलात आढळला एमपीतील महिलेचा मृतदेह

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ४ :

जिल्ह्याच्या दवनीवाडा पोलीस ठाण्याअंतर्गत बोंडराणी जंगलात एका तरुणीचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळला. मृत महिलेच्या चेहऱ्यावर अॅसिड टाकल्याचे व शरीरावर जखमा असल्याचे आढळल्याने तिचा खून करून मृतदेह जंगलात फेकल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पुनम राकेश तुमाने (वय २८, रा. खैरी, जिल्हा बालाघाट, मध्य प्रदेश) असे मृत महिलेचे नाव आहे.

पुनम तुमाने ही महिला २८ जानेवारी रोजी खैरी येथीलच संजय तितमारे याच्यासोबत वाराशिवनी न्यायालयात पेशी असल्याचे सांगून घरून आली होती. यानंतर पुनम व संजय हे दोघेही २८ जानेवारीला तिरोडा तालुक्यातील परसवाडा टी पॉइंटवर आले. तिथून पूनमने आपल्या आईला घरी येणार आहे एवढे सांगून फोन कट केला. मात्र रात्री उशिरापर्यंत पुनम घरी परतली नाही. तिकडे संजयने पुनमच्या घरी जाऊन तुमची मुलगी माझ्यासोबत परत आली नाही, ती घरी आली का? अशी विचारणा पुनमच्या वडिलांना केली.

यानंतर ते वाराशिवणी व रामपायलीकडे पूनमचा शोध घेण्यासाठी गेले. पण तिचा शोध न लागल्याने बालाघाट जिल्ह्यातील खैरलांजी पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. दरम्यान, बोंडराणी जंगलाकडील पांदण रस्त्यालगत एका तरुणीचा मृतदेह चंद्रकुमार भगत यांना दिसून आला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेहाचा पंचनामा केला. पुढील तपास दवनीवाडा पोलीस करीत आहेत. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.



■ *नागपूर : महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीचे महासचिव केतन विकास ठाकरे यांचा वाढदिवस प्रभाग १४, सदर भागातील कस्तूरबा लाइब्रेरी गार्डन येथे साजरा करण्यात आला. यांप्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवक अभिजित झा, सामाजिक कार्यकर्ता कमल नारायण नामपल्लीवार, माजी नगरसेवक, कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते. यावेळी सफाई कामगारांना पाण्याची बॉटल आणि मिठाईचे वाटप करण्यात आले.*

## कचरा व्यवस्थापनातून उद्योगाच्या संधी

**लोकजागर**



कचरा व्यवस्थापनाच्या कार्यामध्ये उद्योगाच्या प्रचंड संधी आहेत. मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर काम होण्याची आवश्यकता सुद्धा आहे, हे वास्तव आता सगळ्यांना पटू लागले आहे. परंतु ह्याबरोबरच एक वास्तव असे सुद्धा आहे की, आधी संकलन करण्याची व्यवस्था निर्माण करायची की आधी प्रक्रिया करण्याची व्यवस्था निर्माण करायची?

पण समाज याच्यावर उत्तर शोधू शकतो, हे सांगली - मिरज -कुपवाडच्या नागरिकांनी सिद्ध करून दाखवले आहे.भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त विविध व्यक्ती, सामाजिक संस्था आणि संघटना एकत्र येऊन एक समिती स्थापन करतात. त्या समितीमार्फत ई-कचरा संकलनाची एक मोठी मोहीम आखली जाते. तिला समाज भरभरून प्रतिसाद देतो.

या मोहिमेचे तीन टप्पे पूर्ण होतात. दहा टनांहून अधिक कचरा संकलित केला जातो आणि चौथा टप्पा म्हणून संपूर्ण महापालिका क्षेत्रामध्ये ई-संकलन केंद्रे उभी करण्याची प्रक्रिया पूर्ण होते. एवढेच नाही, तर शहरांमधले तीन तरुण उद्योजक जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी यावर प्रक्रिया करून उपयुक्त वस्तू निर्माण करण्यासाठी आपल्या आपल्या आस्थापना प्रशासनाच्या विविध खात्यांकडून मंजूर करून घेतात आणि हे सारे घडते केवळ एक वर्षाच्या आत!

पर्यावरण संरक्षण गतिविधि समाजामध्ये मिसळून, समाजाला सोबत घेऊन विविध उपक्रम राबवते. ते उपक्रम झाडासंबंधीचे असतात, पाण्यासंबंधीचे असतात, कचरा व्यवस्थापनासंबंधीचेही असतात.

कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तू जी निरुपयोगी आहे, खराब झाली आहे अथवा तिचे आयुष्य संपले आहे ती इलेक्ट्रॉनिक कचऱ्यामध्ये समाविष्ट होते. आपल्या घरामध्ये वर्षानुवर्षे धूळ खात पडलेला टीव्ही, रेडिओ, इस्त्री, हेडफोन, मोबाइल, चार्जर, मिक्सर, प्रिंटर, मोटर, पंप अथवा वायर या सगळ्या गोष्टी एकदा निकामी झाल्या की अडगळ तर होतातच, आणि शेवटी कचऱ्यातच जमा होतात.

तंत्रज्ञान सुधारतेय, तशा घरात नवीन नवीन इलेक्ट्रॉनिक वस्तू येतात आणि जुन्या वस्तू बाजूला पडत जातात. अशा एक ना अनेक वस्तू सीडी-डीव्हीडीपासून अगदी वॉशिंग मशीनपर्यंत ज्या काही बंद अवस्थेत पडून आहेत आणि त्यांची दुरुस्ती होऊ शकत नाही, अशा सर्व वस्तू ई-कचरा म्हणून गणल्या जातात.

ई-कचऱ्यामध्ये अनेक प्रकारचे धातू उदा., पारा (मर्क्युरी), शिसे (लेड), कॅडमियम, लिथियम, बेरियम इ. वापरले जातात. हे पदार्थ मानवी शरीरासाठी विषारी असतात आणि आपल्या वेगवेगळ्या अवयवांवर त्याचा परिणाम होतो. जेव्हा आपण हा कचरा फेकून देतो, तेव्हा कालांतराने त्याचे नैसर्गिकरित्या विघटन सुरू होते. या प्रक्रियेत त्यातून अनेक हानिकारक घटक बाहेर पडतात आणि त्याचा परिणाम फक्त हवेवरच नाही, तर पाण्यावर आणि मातीवरही दिसून येतो. विघटनातून तयार झालेले अगदी बारीक कण आणि वायू हवेत मिसळतात. वायुप्रदूषणात तर भर पडतेच, आपल्या श्वसनाद्वारे ते आपल्या शरीरात जातात.

सांगलीमध्ये सुरू झालेल्या या ई-कचरा संकलन उपक्रमाची व्याप्ती पाहून महानगरपालिकेने सहजपणे आपली स्वीकृती आणि आपला सहभाग नोंदवला..सांगली, मिरज आणि कुपवाड शहरांमध्ये एकूण ४३ संकलन केंद्रांची ऑनलाइन नोंदणी झाली. १५ ऑगस्टपूर्वी या सर्व संकलन केंद्राच्या कार्यकर्त्यांनी आपल्याआपल्या परिसरामध्ये जागृतीचे काम केले. सोशल मीडिया आणि प्रस्थापित प्रिंट मीडियासुद्धा या नावीन्यपूर्ण मोहिमेमध्ये सहभागी झाले.

ही मोहीम केवळ शहरापुरती न राहता तासगाव तालुका, पलुस तालुका, इस्लामपूर तालुकासुद्धा यामध्ये सहभागी झाले. योजनेप्रमाणे !अनेक संस्था आपला बॅनर आणि आपला अभिमान, अभिनिवेश बाजूला ठेवून एका विशिष्ट कायार्साठी एकाच छताखाली एकत्र येऊन नियोजन करण्याची आणि एकच बॅनर हातात घेऊन काम करण्याची एक नवी परंपरा सुरू झाली. आजच्या या घडीला अत्यंत आवश्यक असलेले पर्यावरण संरक्षणाचे काम झाले, हे वेगळे सांगायची मुळीच आवश्यकता नाही.

■ ■ ■

## प्रयोगशील तरुण शेतकरी शुभम



कोकणातील अनेक तरुण शिक्षण घेतल्यानंतर मुंबई पुण्याकडे नोकरीसाठी जातात. कोकणात रोजगाराच्या संधीला मर्यादा असल्याने मुंबई, पुणे किंवा मोठ्या शहरांमध्ये गेल्याशिवाय पर्याय राहत नाही. मात्र कोकणातील एका तरुणाने कृषी विद्यापीठातून कृषी पदवी घेतल्यानंतर गावातच राहून बिगर हंगामी कलिंगड लागवडीचा यशस्वी प्रयोग केला आहे. संगमेश्वर तालुक्यातील लोवले गावातील तरुण शेतकरी शुभम दोरकडे असं या प्रयोगशील शेतकरी तरुणाचं नाव आहे. शुभमच्या शेतातून उत्पादित होणाऱ्या या कलिंगडाला आता मोठी मागणी आहे.

दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात कृषी शिक्षण घेतल्यानंतर नोकरी न करता स्वतःच्या शेतातच काहीतरी नवीन प्रयोग करून आर्थिक उत्पन्न मिळवण्याचा विचार शुभमने केला. सप्टेंबरमध्ये बागेच्या दोन ओळींमध्ये विशेष बेड तयार करून विजय वाणाची कलिंगड लागवड केली. जूनपूर्वी संपणाऱ्या कलिंगड हंगामाच्या बाहेर हा प्रयोग करणं तसं मोठं आव्हान होतं. परंतु योग्य नियोजन, सिंचन आणि खत व्यवस्थापनामुळे हा प्रयोग यशस्वी केला आहे.

शुभमने अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कृषी शिक्षणाच्या ज्ञानाचा उपयोग करून पारंपारिक शेतीपासून एक पाऊल पुढे टाकत बिगर हंगामी कलिंगडाचे आंतरपीक घेऊन लाखोंचा नफा मिळवला आहे. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करणाऱ्या तरुणांची संख्या वाढत असताना शुभमची ही यशोगाथा प्रेरणादायी ठरत आहे. लागवडीवेळी ह्युमिक अॅसिड, 19:19:19, बुरशीनाशक - कीटकनाशकांचा वापर, तसंच बेसल डोसमध्ये स्मार्ट मिलसह सेंद्रिय खत, 10:26:26, सूक्ष्म अन्नद्रव्यं, घरचं गांडूळ खत, पोटॅशियम शोनाइट, कॅल्शियम, मॅग्नेशियम, बोरॉन यांसारखी खतं ठिंबक सिंचनाच्या मदतीने दिल्याने कलिंगडाची वाढ उत्कृष्ट झाली.

काळजीपूर्वक चार-पाच दिवसांच्या अंतराने फवारण्या घेऊन पिकावर नियंत्रण ठेवलं. या ऑफ-सीजन पिकासाठी पुणे आणि वाशी, नवी मुंबई बाजारपेठांमध्ये भेट देऊन शुभमने मार्केटिंगची पूर्वतयारी केली. कलिंगड व्यापाऱ्यांशी संपर्क साधून दरांचा अभ्यास केला. परिणामी, त्यांच्या शेतातूनच प्रतिकिलो 20 रुपये दराने थेट विक्री सुरू झाली. लागवडीनंतर 52 दिवसांतच तोडणी सुरू झाली असून सुमारे 10 टन कलिंगडाचं उत्पादन मिळणं अपेक्षित आहे. एकूण दोन लाख रुपयांचं उत्पन्न होणार असून खर्च वजा करता तब्बल 1 लाख 40 हजारांचा निव्वळ नफा शुभम दोरकडेच्या हाती मिळेल असा शुभमचा अंदाज आहे. पहिल्याच प्रयोगात शुभम यशस्वी ठरला आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मनपात वाढला सत्ता संघर्ष

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ४ :

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसमधील अंतर्गत कलहाचा थेट फटका सत्तास्थापनेला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काँग्रेसशी निवडणूकपूर्व आघाडी असलेल्या जनविकास सेनेचे प्रमुख पप्पू देशमुख यांनी काँग्रेसला स्पष्ट इशारा दिला आहे. काँग्रेसच्या अंतर्गत मतभेदांमुळे भाजपचा महापौर निवडून आल्यास, त्या क्षणी काँग्रेससोबतची आघाडी तोडण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले आहे.

जनविकास सेनेचे चंद्रपूर महापालिकेत तीन नगरसेवक असून ६६ सदस्यांच्या सभागृहात बहुमतासाठी ३४ नगरसेवकांची आवश्यकता आहे. सध्या प्रत्येक नगरसेवक महत्त्वाचा ठरत असताना जनविकास सेनेच्या भूमिकेमुळे काँग्रेसच्या अडचणी वाढल्या आहेत.

देशमुख यांनी सांगितले की, या निवडणुकीत ६६ पैकी ४२ नगरसेवक भाजपविरोधी विचारांचे निवडून आले असून ही निवडणूक भाजपविरोधी होती. आम्ही काँग्रेससोबत राहून शहराला स्वच्छ व पारदर्शक कारभार देण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र काँग्रेसच्या अंतर्गत कलहामुळे भाजपचा महापौर झाला, तर आम्ही काँग्रेसविरोधातही त्याच ताकदीने लढू, असा इशाराही पप्पू देशमुख यांनी दिला आहे.

दरम्यान, चंद्रपूर महापालिकेतील सत्तास्थापनेसंदर्भात काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी सुचवलेल्या तोडग्यामुळे वडेट्टीवार गटात नाराजी पसरली आहे. काँग्रेस श्रेष्ठींनी महापौरपद धानोरकर गटाला देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती असून, अधिक नगरसेवक असूनही वडेट्टीवार गटाला महापौरपद का दिले जात नाही, असा सवाल या गटातील नगरसेवकांकडून उपस्थित केला जात आहे. आमची संख्या जास्त असूनही सत्तेत सन्मानजनक वाटा मिळत नसल्याची भावना वडेट्टीवार गटातील नगरसेवकांमध्ये असल्याचे समजते.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासाठी
# बाबांनी घातल्या तीन अटी

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ४ :



सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी विलीनीकरणासाठी शरद पवार गटापुढे ३अटी ठेवल्या आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांच्या भूमिकेविषयी संभ्रमावस्था ठेवत त्यांच्यापुढे सुनेत्रा पवारांचे नेतृत्व मान्य करण्याच्या अटीचा समावेश आहे. यामुळे विलीनीकरणाचा तिढा अधिकच बिकट होण्याची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया स्थगित झाली आहे. शरद पवार गटाने ही चर्चा थेट अजित पवारांशी सुरू होती असे नमूद सांगितले तर अशी कोणतीही चर्चा सुरू नव्हती असे अप गटाकडून स्पष्ट केले जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी शरद पवार गटापुढे ३ अटी ठेवल्या आहेत. या अटी मान्य असतील तरच दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण होईल अन्यथा नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

धर्मरावबाबा आत्राम यांनी अजित पवारांनी विलीनीकरणाचा मुद्दा आमच्यासोबत केव्हाही काढला नसल्याचे म्हटले आहे . विलीनीकरणाची १२ फेब्रुवारीची तारीख ठरली असती, तर त्यांनी तसे आम्हाला सांगितले असते.

धर्मरावबाबा आत्राम यांच्या मते, दोन ताईंपैकी सुनेत्रा ताई आमच्या नेत्या आहेत. आम्ही आमचा नेता निवडला आहे. आमच्या पक्षात शरद पवार यांचा पक्ष विलीन झाल्यानंतर सुप्रिया ताईंचा रोल काय राहील हे आम्ही ठरवू. पण नेतृत्व सुनेत्रा ताईंकडेच असेल.

आम्हाला सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत (एनडीए) राहायचे आहे. आमचे चिन्ह घड्याळ आहे. या चिन्हाखाली त्यांना एकत्र यावे लागेल. शरद पवार गटाला घड्याळ चिन्ह स्वीकारून एकत्र यावे लागेल. सुनेत्रा ताईच आच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष असतील.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यानंतरही एनडीएसोबत राहणे गरजेचे आहे. शरद पवार गट एनडीएसोबत येणार नसेल, तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन काही फायदा नाही, असेही आत्राम यांनी या प्रकरणी सांगितले आहे.

धर्मरावबाबा यांनी या अटींद्वारे एकप्रकारे दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण शक्य असल्याचेच संकेत दिलेत. त्यामुळे आता या प्रकरणी सत्ताधारी राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे कोणती भूमिका घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# एफडीएची धाड : बोगस खव्याचा कारखाना सील

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ४ :




येथील लोहारा एमआयडीसी परिसरात गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेल्या बोगस खवा आणि पेढा कारखान्याचा पदार्फाश झाला. या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकत टाळे ठोकले.

कृष्णा पुसनाके, सचिन मनवर आणि प्रा. पाठे यांनी प्रशासनाला या प्रकरणी माहिती दिल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. प्लॉट क्रमांक बी ४५,अॅडिशनल एरिया येथे सवाई सिंग राज पुरोहित यांच्या मालकीच्या श्री डी. के. बेकरी अँड नमकिन या कारखान्यात हा गोरखधंदा सुरू होता.

सोशल मीडिया काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, सचिन मनवर आणि शेतकरी चळवळीचे प्रा. पंढरी पाठे यांना या कारखान्याबाबत संशयास्पद हालचाली दिसून आल्या. त्यांनी औषध प्रशासनाचे सहआयुक्त महाजन यांना याची माहिती दिली. अन्न सुरक्षा अधिकारी अमितकुमार उपलप आणि लोहारा ठाणेदार रोहित चौधरी यांच्या पथकाने कारखान्यावर धडक दिली. तपासणीदरम्यान कारखान्यात अस्वच्छतेचे साम्राज्य आणि भेसळीचे पुरावे आढळून आले. येथून सुमारे ५० ते ७० हजार रुपये किमतीचा बोगस खवा आणि पेढा जप्त करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, गेल्या दोन वर्षांपासून शहराच्या नाकावर टिच्चून सुरू असलेल्या या कारखान्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे उघड झाले. कारखान्यात राजस्थानचे चार कामगार असून त्यातील दोन अल्पवयीन असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. केवळ नफ्यासाठी जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या या भेसळखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

**गुजरातचे लेबल!**

या छाप्यात ग्राहकांची दिशाभूल करणारा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा बोगस खवा आणि पेढा यवतमाळच्या लोहारा एमआयडीसीत घाणेरड्या जागेत तयार केला जात होता. मात्र, विक्रीसाठी त्यावर गुजरातमधील प्रसिद्ध कन्हैया कंपनीचे लेबल आणि पॅकेजिंग वापरले जात होते. स्थानिक ग्राहकांना ब्रँडेड माल असल्याचे भासवून त्यांच्या माथी हे भेसळयुक्त विष मारले जात होते. या रॅकेटचे धागेदोरे गुजरातपर्यंत पोहोचले आहेत का, याचा तपास आता पोलीस करत आहेत.